


# श्री साईलीला

शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक

या अंकांत —


- देव भावाचा भुकेला
- बाबांची लीला
- शास्त्रज्ञांची चंद्रावरील स्वारी
- साधन नामाचें सार
- शस्त्रधार्‍यांतील श्रेष्ठ श्रीराम मीच आहे
- सुख पहातां जवापाडें
- रामदासीं नसावी ममता
- संत समागम गोड
- श्रीज्ञानेश्वरीसंबंधीं कांहीं विचार
- पुण्यतिथ्योत्सवाचा सोहळा
- संत-वाणीचे अमोल बोल

आमच्या सर्व साईभक्तांना यंदाची दिपवाळी
धनधान्य, सुवर्ण यानें सुखाची जावो

स्थापना १९१६



श्री
साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

## ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



# श्री साई लीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ३६ वें : अंक ८ वा

नोव्हेंबर १९५९


संपादक—

नागेश आत्माराम सावंत

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)


टे. नं. २५१२७४

कार्यालय—

ईस्ट अॅण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग

४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १


## श्री साईवाक्सुधा



माझा देह जरी इकडे ।
तुम्हीं सातां समुद्रां पलिकडे ।
तुम्हीं कांहींही करा तिकडे ।
जाणीव मज तात्काळ ॥
कुठेंही जा दुनियेवर ।
मी तों तुम्हांबरोबर
तुम्हां हृदयींच माझें घर ।
अंतर्यामीं तुमचे मी

—श्री साईसच्चरित



# प्रिय वाचक—

गेल्या महिन्यांत प्रसिद्ध झालेल्या पुण्यतिथि विशेषांकचें सर्वांकडून यथोचित कौतुक करण्यात आलें याबद्दल समाधान वाटतें. श्री. 'साईलीला' हें एक आदर्श व आदरणीय मासिक व्हावें, तें घरोघर जावें व सर्वांच्या सुखसमाधानांत त्यानें भाग घेण्यास समर्थ व्हावें हीच आमची आकांक्षा आहे. परंतु कांहीं झालें तरी एकट्या दुकट्या मानवाचे प्रयत्न पुरेसे ठरत नाहींत, त्याला त्याच भावनेनें प्रेरित झालेल्या अनेकांचा सहकार लाभणें अत्यंत जरूर असतें. तसा सहकार यापुढील काळांत उत्तरोत्तर अधिकाधिक प्रमाणांत लाभत जाऊन आमचें श्रीसाईलीलेसंबंधींचें फार दिवसांचें गोड स्वप्न लौकरच साकार होईल अशी आशा वाटते. अशा प्रकारच्या प्रेमळ सहकाराची प्रेरणा श्रीसाईबाबांनीं अनेकांस द्यावी व त्यांच्या करवीं हें महत्तम कार्य पार पाडून घ्यावें हीच त्यांच्या चरणीं आमची प्रार्थना आहे.

श्री साईलीलेंत अंतर्बाह्य अनेक व उपयुक्त स्वरूपाच्या सुधारणा घडवून आणावयाच्या आहेत. त्या एकदम नाहीं अंमलांत आणतां आल्या, तरी श्रीसाई-भक्तांच्या सहकार्यानें त्या आस्ते आस्ते अंमलांत आलेल्या आढळून येतील एवढेंच आम्हीं तूर्त आश्वासन देऊन ठेवतों. मागील अंकीं नम्रतापूर्वक सूचित करण्यांत आल्याप्रमाणें या कार्यांत आमच्या श्री साईभक्त वाचकांनीं प्रत्येकीं पांच किंवा निदान दोन तरी वर्गणीदार मिळवून देण्याचें कृपा करून मनावर घ्यावें, अशी विनंती आहे.

श्रीसाईबाबांची सेवा करण्याचे मार्ग विविध आहेत. प्रत्येकाला आपल्या आवडीप्रमाणें व कुवतीप्रमाणें सेवा करतां येणें शक्य आहे. मनाची तयारी व्हावी लागते श्रीसाईलीला हें श्रीबाबांच्या सेवेस वाहिलेलें मासिक आहे. त्रैमासिकाचें मासिकांत रूपांतर करण्यांत आलें; त्यांतील मुख्य हेतु भक्तजनांची अधिकाधिक सेवा घडावी, भक्तांना व साधकांना तीन महिन्याऐवजीं दरमहा भेटतां यावें व त्यांच्या सुखदुःखाचे वांटेकरी होतां यावें हेंच होय. परंतु वाचकांकडून या कार्यांत ज्या प्रमाणांत सहकार्याची अपेक्षा करण्यांत आली होती त्या प्रमाणांत ती फलद्रूप झालेली नाहीं. साईभक्त वाचकांस अद्याप आमची पुन्हा नम्रतापूर्वक विनंती आहे कीं, त्यांनीं वर्गणीदार वाढविण्याचें कार्य आपापल्या भागापुरतें कृपा करून जरूर मनावर घ्यावें.

• • •

शिरडी येथील श्रीसाईबाबांचा पुण्यतिथ्युत्सव दर वर्षाप्रमाणें यंदाही थाटांत व यशस्वी रीतीनें पार पडला हें

या अंकीं प्रसिद्ध होणाऱ्या उत्सवाच्या अहवालावरून समजून येईलच. या उत्सवगर्दीत भाग घेण्याचें भाग्य ज्यांना लाभलें ते धन्य होत. उत्सवापूर्वी दोन दिवस अगोदर शिरडींत, त्याचप्रमाणें मुंबईत पाऊस पडल्यामुळें भक्तगणांची संख्या दरवर्षाच्या मानानें कमी होती. वर्षानुवर्ष उत्सव महात्म्य वाढत चाललें आहे व यात्रेकरूंच्या सुखसोयींसाठीं संस्थान समितीकडून जरूर व शक्य ते उपाय करण्यांत येत आहेत ही समाधानाची गोष्ट होय. शिरडी येथें येणाऱ्या जाणाऱ्यांची वर्दळ रोजचीच असते; परंतु यात्रेच्या दिवसांत तिची कल्पनातीत वाढ होत असते. कित्येक यात्रेकरू एकटे दुकटे येतात. त्या सर्वांना आल्याबरोबर वास्तव्यासाठीं जागेची सोय होतेच असें नाहीं किंवा कांहीं यात्रेकरू एखाद्या दिवसासाठींच येतात त्यांच्याजवळ पैसाअडका किंवा जडजोखमाच्या वस्तु असतात. शौचास जायचें असतें स्नान उरकायचें असतें व कार्यक्रमांचा व भोजनाचाही लाभ घ्यायचा असतो. प्रत्येक वेळीं पैशांचें पाकीट किंवा जवळ असल्यास जडजोखीम कुठें ठेवायचें हा प्रश्न किंवा ही अडचण यात्रेकरूपुढें उभी रहाते. संस्थान समितिला या अडचणीची जाणीव पूर्वीपासून झालेली होती. ही अडचण कशी दूर करावी याचा विचार चालू होता. लिहिण्यास आनंद वाटतो कीं, यंदा विजयादशमीच्या सुमुहूर्तावर त्या अडचणीचें निराकरण करण्यांत आलें आहे. समाधिमंदिराजवळ अत्यंत सुरक्षित स्थळीं गोद्रेज कंपनी मार्फत मजबूत लॉकर्स (खण) बनवून घेण्यांत आले आहेत. प्रत्येक खणाची स्वतंत्र चावी-खणाचें रोजचें भाडें फक्त चार आणे. यासंबंधीं जरूर ते नियम करण्यांत आले असून सर्व व्यवस्था चोख करण्यांत आली आहे. शिरडीस येणाऱ्या भक्तजनांच्या दृष्टीनें ही अत्यंत आवश्यक व महत्त्वाची सोय संस्थान समितीकडून करण्यांत आली असून तिचा फायदा भक्तजनांकडून जरूरीप्रमाणें करून घेतला जाईल अशी अपेक्षा आहे.

• • •

दुसरी एक महत्वाची व आनंदाची बातमी आमच्या वाचकांस कथन करावयाची आहे. श्री साईबाबा शिरडी संस्थानच्या मुंबई कचेरीसाठीं, तसेंच व्यवस्थापक समितीच्या सभांसाठीं संस्थानच्या मालकीची मुंबईत जागा असावी अशी फार दिवसांची मनिषा होती. श्रीसाईबाबांच्या कृपेनें ती पूर्ण झाली असल्याचें लिहिण्यास आनंद वाटतो. दादर येथें विन्सेंट रोडवर (खुदादाद सर्कल नजीक) हरीनिवास नावाची दोन मजली सुंदर इमारत संस्थाननें खरेदी केली असून, गेल्या नारळी पौर्णिमेस तिचें '**साईनिकेतन**' असें नामकरण होऊन त्या नांवाचा इमारतीवर फलकही लावण्यांत आला. श्रीसाईबाबांच्या कृपेनें या इमारतीवर लौकरच संस्थान कचेरीसाठीं एक मजला बांधण्याचें काम सुरू व्हावयाचें आहे. ही इमारत मजबूत असून दोन्ही दादर

स्टेशनांपासून नाजिक व ट्राम-बसच्या रस्त्यावर आहे. मुंबईंत येणाऱ्या व वास्तव्य करणाऱ्या श्रीसाईभक्तांच्या दृष्टीनें ही एक फार महत्वाची गोष्ट घडून आलेली आहे.

● ● ●

श्रीसाई भक्तांची कोठेंही व कोणत्याही प्रकारें फसवणूक होऊं नये या हेतूने एक सूचना आम्हांला वारंवार द्यावी लागत असते. श्रीसाईबाबांच्या पश्चात् शिरडी येथील सर्व व्यवस्था संस्थान समितीमार्फत चालत आली असून, त्यांचा खास असा कोणी शिष्य कुठेंही नाहीं. तरी याबाबतींत गैरसमजुतीनें कोणीही स्वतःची फसवणूक करून घेऊं नये. श्रीसाईबाबांसाठीं कोणाही मध्यस्थाची जरूरी नाहीं. श्रीसाईबाबांच्या नांवाखालीं मुंबईंत व इतरत्र विशेषतः उत्सवाच्या वेळीं फंड गोळा केले जात असतात. त्या फंडाशीं शिरडी-संस्थानचा कोणत्याही प्रकारें संबंध नाहीं. शिरडी संस्थानची शाखा कुठेंही नाहीं. तरी भक्तांनीं गैरसमज करून घेऊं नये व कोणत्याही प्रकारच्या भुलथापांस बळी पडूं नये. वेळोवेळीं ठिकठिकाणच्या भक्ताकडून संस्थान समितीकडे विचारणा केली जात असते एवढ्यासाठीं ही सावधगिरीची सूचना देण्यात येत आहे.

● ● ●

दिल्ली येथील 'आयुर्वेद रिसर्च कौन्सिल'कडून आमच्याकडे एक महत्वाचें माहितीपत्रक आलें असून अखिल जनतेच्या दृष्टीनें व विशेषतः ज्यांची दृष्टि मंद झालेली आहे, व ज्यांचें चष्म्याशिवाय चालत नाहीं, अशा असंख्य लोकांच्या दृष्टीनें तें महत्त्वाचें व उपकारक असल्यामुळें त्याची याठिकाणीं माहिती करून देण्यांत येत आहे. 'पुनर्नवा' या नांवाची भारतांत सर्वत्र उगवणारी वनस्पति नेत्ररोगांवर रामबाण ठरली आहे. त्या वनस्पतीपासून तयार केलेल्या औषधाचा 'आयुर्वेद रिसर्च कौन्सिल'-कडून अनेकांच्या बाबतींत उपयोग करून पहाण्यांत आला व तो यशस्वी ठरला. पुनर्नवा अंजन डोळयांच्या रोगांवर सर्वोत्तम ठरल्यामुळें त्याचा बहुजन समाजास शक्य तेवढ्या जास्त प्रमाणांत उपयोग व्हावा या हेतूनें आ. रि. कौन्सिलतर्फे लौकरच जागोजाग केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत. सध्यां अनेक इस्पितळांतून या औषधाचा उपयोग सुरू झालेला आहे. या बाबतींत अधिक माहितीसाठीं 'आयुर्वेद रिसर्च कौन्सिल' मदारसा रोड, काश्मिरी गेट, दिल्ली, या पत्यावर पत्रव्यवहार करण्यांत यावा. 'आयुर्वेद रिसर्च कौन्सिल'च्या या लोकोपयोगी कार्यांत आम्हीं सुयश चिंतितों.

● ● ●

श्री साईलीलेचा हा अंक वाचकांच्या हातीं पडेल त्यावेळीं दिवाळीचा आठवडा सुरू झालेला असेल. श्रीसाईबाबांच्या कृपेनें यंदाची दिवाळी आमच्या वाचक बंधूभगिनींस, सुखासमाधानाची जावो असें आम्हीं इच्छितों.

———




संकलक : **आमचे प्रतिनिधि**

**एच. एस. लाल,** अर्सीकेरी, बंगलूर हे श्री. साईबाबांच्या भेटीसाठीं व एक वर्षापूर्वी केलेला नवस फेडण्यासाठीं गेल्या पुण्यतिथि उत्सव प्रसंगीं शिरडीस आले होते. "इतक्या दूर अंतरावरून आपण शिरडींत आलां तेव्हां बाबांच्या अगाधलीलेचा तसाच कांहीं तरी अनुभव आपणास आलेला असावा. तो आपण सांगाल कां ? असें म्हणतांच श्री. लाल म्हणाले, "न सांगायला काय झालें ? उगाच कोणी कोणाकडे जात नाहीं. आम्हीं शिरडीस आलों ही बाबांची कृपा. आम्हीं सहा बंधू व एकच बहीण अशीं सात भांवडें. वडील वारल्यामुळें बहिणीच्या विवाहाची जबाबदारी सर्वांत मोठा भाऊ या नात्यानें माझ्यावर आली. माझा कोणावरही विश्वास नव्हता. आमच्या बंगलूरमध्यें साईबाबांचें मंदीर आहे. परंतु मला तेथें जाण्याची कधीं बुद्धि झाली नाहीं. नटराज या नावाचा माझा एक मित्र होता. त्याची बाबावर श्रद्धा होती. तो नित्यनेमानें मंदिरांत जात असे. एके दिवशीं तो माझ्या कपड्याच्या दुकानीं आला व मला साईबाबांच्या मंदिरांत येण्याचा आग्रह करूं लागला. मी त्याच्या आग्रहाकडे दुर्लक्ष केलें; परंतु त्यानें माझा पिच्छा सोडला नाहीं. त्याची नेहमींची कटकट चुकवावी या हेतूनें मी एके दिवशीं साईबाबांच्या मंदिरांत गेलों. आणि त्यानंतर सवडीप्रमाणें कधींमधीं जाऊं लागलों.

बहिणीसाठीं योग्य वर पहाण्याच्या उद्योगांत असतां उटकमंड येथील वैद्यकीय कॉलेजांत शिक्षण घेत असलेल्या एका तरुणाची मी निवड केली. वधू परीक्षेंत माझी बहिण चांगली उतरली; परंतु मुलाच्या वडिलांनी पंचवीस हजार रु. हुंडा मागितला. रोख पांच हजार रुपये व ५।६ हजार रुपयांचें सोनें नाणें वगैरे देण्याची आमची तयारी होती; परंतु मुलाचा बाप मागणीसंबंधींचा आपला हट्ट कांहीं केल्या सोडीना. आमच्या सर्वांच्या मनांत तें स्थळ फार भरलें होतें; परंतु परापरीचे प्रयत्न करूनही मुलाचे वडील आपला हट्ट सोडायला तयार होईनात तेव्हां आम्हीं निराश झालों. कांहीं मार्ग राहिला नव्हता. निराशेच्या मनःस्थितींत मी दुकानांत बसलों

असतां माझा मित्र नटराज तेथें आला व मला सचिंत पाहून चिंतेचें कारण विचारूं लागला. तें सांगतांच त्यानें मला धीर दिला व म्हणाला, 'वेड्या, चिंता कसली करतोस. चिंता निवारण करणारे बाबा आहेत. त्यांच्यावार भार टाकून तर पहा. निष्ठेनें कांहीं ना कांहीं नवस कर त्यांच्यावर सारा भरिभार टाक आणि पहा!'

मी त्याच्याबरोबर साई मंदिरांत जाऊन श्रीसाईबाबापुढें माझें दुःख ठेविलें व त्यांना नवस केला. त्याचप्रमाणें योग्य वेळीं शिरडीस जाऊन नवस फेडीन असेंही म्हणालों. मला दुसरा मार्गच राहिला नव्हता. अगतिक होऊन मी बाबांचें ध्यान करीत राहिलों. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे दुसऱ्याच दिवशी वरपक्षाकडून तार आली कीं, "विवाह मुहूर्त ठरविण्यासाठीं तावडतोब निघून या. आमच्या अटीतटी कांहीं नाहींत. तुम्हीं कराल तें मान्य!"

त्या तारेनें आम्हां सर्वांना किती तरी आनंद झाला. लग्न समारभ थाटांत व अत्यंत समाधानकारक रीतीनें पार पडला. अडचण मुळींच उपस्थित झाली नाहीं. ही सारी बाबांची कृपा या गोष्टीची खूण मला पूर्णपणें पटली आणि म्हणून केलेला नवस फेडण्यासाठीं मी शिरडीस आलों.

———



—श्रीसाईसच्चरित (गद्यानुवाद) अध्याय २ रा, या अंकीं जागेच्या अभावीं देतां आला नाहीं. तो पुढील अंकीं प्रसिद्ध होईल.

—संपादक

आपुल्या आपुल्या कर्मी दक्ष तो मोक्ष मेळवी।
ऐक लाभे कसा मोक्ष स्वकर्मी लक्ष लावुनी॥
प्रेरी जो भूतमात्रांस ज्याचा विस्तार विश्व हें।
स्वकर्म—कुसुमीं त्यास पूजितां मोक्ष लाभतो॥

—गीताई

# * संत समागम गोड *

संतांच्या सहवासांत १।२ क्षण जरी घालवायला मिळाले तरी ते सुखासमाधानाला कारणीभूत होत असतात. साधकांस ते प्रेरक त्याचप्रमाणें स्फूर्तिदायक होऊन रहात असतात. श्रीसाई सच्चरितांत निवेदल्याप्रमाणें—

केवळ 'जगाचिया उपकारा। चुकवाया जन्ममरणाचा फेरा।
त्यागुन निर्गुण निराकारा। आले हे आकारा संत जगीं॥

## अहंकाराचें प्रायश्चित

विद्वानांचें व पंडितांचें माहेरघर या नात्यानें काशीक्षेत्राची ख्याति पूर्वीपासून आहे. तेथें पंडीत सर्वाजित या नांवाचे एक बडे जाडे विद्वान परंतु अहंमन्य गृहस्थ रहात असत. पांडित्यांत सर्वांना जिंकणारा ता सर्वाजित! केवळ काशीक्षेत्रांतीलच नव्हेतर भारतांतील अन्य ठिकाणच्या पंडितांस त्यानें शास्त्रार्थांत व पांडित्यांत जिंकिलें होतें. श्रीमत् आद्य शंकराचार्यांप्रमाणें दिग्वीजय करून सर्वांवर मात करण्याची त्याची महत्वाकांक्षा होती.

त्या महापंडिताला त्याची माता एकदां म्हणाली. 'लोक मुला सर्वाजित म्हणत असतील. परंतु जोंपर्यंत संत कबिराशी शास्त्रार्थ करून त्या महापुरुषाला तूं जिंकलें नाहींस तोंपर्यंत मी तरी तुला सर्वाजित म्हणणार नाहीं!'

'असें का? बरं आहे.! तुझ्या म्हणण्याप्रमाणें कबिरालाही जिंकून त्याच्याकडून अजिंक्यपद घेऊन येतों. मग तर झालें ना?' असें बोलून पंडित सर्वाजित कबिराच्या मठांत आले व मला तुमच्याशीं शास्त्रार्थ करावयाचा आहे तरी सिद्ध व्हा असें त्यांना सांगूं लागले.

'माझ्याशीं शास्त्रार्थ! आणि तो कशासाठीं बाबा? त्या जंजाळांत मला कां ओढतेस?' कबिरानें विचारलें.

'मी सर्वशास्त्रसंपन्न पंडीत आहें! आजपर्यंत बहुतेक सर्व शास्त्रीपंडितांस मी शास्त्रार्थांत हरविलें आहे. आजकाल माझी बरोबरी करणारा कोणीही दिसत नाहीं; परंतु असें असतांही माझी माता म्हणते कीं संत कबिरास शास्त्रार्थांत जोपर्यंत तूं हरवूं शकला नाहींस तोंपर्यंत मी तुला सर्वाजित म्हणणार नाहीं. आणि म्हणून आपल्याकडे यावें लागलें."

'अरेरे! आपण विनाकारण तसदी घेतली. जय मिळविण्यासाठीं एवढें अवडंबर कशाला? मी थोडक्यांत तुमची सुटका करतों. जयपत्रक आणलें आहे का बरोबर? त्यांत कबीर शास्त्रार्थांत हरला आणि मी जिंकलों असें खुशाल लिहून टाका. माझी संपूर्ण संमती आहे त्याला!'

पंडीत सर्वाजित आनंदीत झाले. 'जितं मया' या अहंकारानें त्यांनीं त्या प्रमाणें जयपत्रकावर लिहिलें. त्याला कबीराची संमती मिळवून तें अजिंक्य पत्र घेऊन आपल्या मातेपाशीं गेले व ते वाचून दाखवूं लागले.

त्यांनीं काय वाचून दाखविलें!

## 'कबीर जिंकले व सर्वाजित हरले'

ते ऐकून सर्वाजित यांची माता खद-खदून हसली व म्हणाली, "सांगितलं होतं ना मी तुला? आली त्याची प्रचीति?"

"छे! छे!! घाईत मी भलतेंच लिहून घेतलें, पुन्हां त्यांच्याकडे जाऊन त्यांच्याच पुढ्यांत स्पष्टपणें लिहून अजिंक्य पत्र घेऊन परत येतों म्हणजे झालें ना!"

असें सांगून पंडीत सर्वाजित कबिराच्या मठांत पुन्हां गेले त्यांच्याच पुढ्यांत 'पं. सर्वाजित जिंकले व कबीर हरले' हें वाक्य स्पष्टपणें लिहून व खात्री करून घेण्यासाठीं पुन्हां पुन्हां वाचून पाहून परत मातेजवळ आले व तिला अजिंक्यपत्र वाचून दाखवूं लागले. मातेच्या पुढ्यांत त्यांनीं काय वाचलें?

## 'कबीर जिंकले व सर्वाजित हरले!'

पुन्हां येरे माझ्या मागल्या! पं. सर्वाजित हतबुद्ध झाले! शरमिंदे झाले! स्वतःच्या डोळ्यांवर त्यांचा विश्वास बसेना पुन्हां ते कबिरापाशीं गेले व पुन्हां आपणास हवा तसा मजकूर त्यांच्या पुढ्यांत लिहून मातेपाशीं आले; पुन्हां तीच पुनरावृत्ती! घरीं येतांच मठांत लिहिलेलें नेमकें उलट व्हायचें! सर्वप्रकारची खबरदारी घेऊन असें ४।५ वेळां घडल्यानंतर पंडीत सर्वाजित जें कांहीं उमजायचें तें उमजले.

त्यांनीं संत कबिरास आदरपूर्वक साष्टांग प्रणिपात केला. त्यांची क्षमा मागितली व त्यांच्या सहवासाची इच्छा प्रगट केली. संत कबीरानीं त्या अहंमन्य पंडितास मोठ्या आनंदानें क्षमा केली. त्यांच्या सहवासांत त्यांनीं जें जवळ नव्हतें तें अमूल्य ज्ञान मिळविलें व नंतर नव्या उमेदीनें जगांत कृतकृत्यता मिळविते झाले.

● ● ●

## 'जे का रंजले गांजले'

खालच्या वर्गांत जन्मास आलेला कोणी एक गृहस्थ केवळ चोरीमारी करून आपली उपजीविका चालवीत असे. चोर कधींतरी सांपडावयाचा; त्याप्रमाणें तो एकेदिवशीं कोतवालाच्या तावडींत सांपडला. त्याच्या हातापायांत बेड्या ठोकून त्याला कारागृहांत ठेवण्यांत आलें. तेथें तो वर्षांच्या वर्षें हाल अपेक्षांत रखडत होता. पोटभर अन्न मिळत नसे. तो दिवसेंदिवस

अशक्त होत गेला. इतका कीं, त्याला चालण्या बोलण्याचीही ताकद राहिली नाहीं. शेवटीं त्याच्या हातापायांतील बेड्या काढून टाकून त्याला तुरुंगाबाहेरच्या मोकळ्या जागीं ठेवण्यांत आलें. त्याच्यांत पळून जाण्याचें त्राण राहिलें नव्हतें. पडला होता लोळत आपल्या आयुष्याचे दिवस कसेबसे ढकलीत! आतां त्याच्यावर कोणाची नजर नव्हती. तो कैदी ही स्थिती पहात होता; पळून जावेसें वाटत होतें; परंतु अंगीं त्राण नव्हतें. हालचाल करून पहात होता. अशा स्थितींत त्याला देव आठवला. तो देवाची करुणा भाकूं लागला. इतक्यांत त्याच्या कानीं हरिनामाचा गजर पडला. कुठन तरी हरिनामाचे पडसाद उमटत होते. त्याचा दुःखभोग संपत आलेला होता. ज्या बाजूनें कीर्तनांतील हरिनामाचा गजर ऐकूं येत होता, त्या बाजूनें हळुहळू सरकत तो पुढें जाऊं लागला व कीर्तनाचें ठिकाण त्यानें एकदाचें गांठलें. एकनाथ महाराज आपल्या वाड्यांत कीर्तन करीत होते. तो इतर मंडळीबरोबर कीर्तनास बसला व रंगूनही गेला.

कीर्तन संपलें. लोक आपापल्या घरीं निघून गेले, तरी तो गृहस्थ एका बाजूला जागच्या जागीं तसाच बैठक मारून राहिला होता. त्याच्याकडे कोणाचें लक्ष गेलें नाहीं. कीर्तन समाप्तीनंतर एकनाथ एकटेच ध्यानस्थ बसले होते. ध्यानधारणा संपतांच त्यांची चोहोकडे नजर गेली. कण्हत कुंथत व असहाय्य स्थितींत बसलेल्या त्या गृहस्थाकडे त्यांची नजर गेली. ते तात्काळ उठून त्याच्याकडे गेले व त्याच्या पाठीवरून हात फिरवीत विचारूं लागले, "काय होतंय तुला? तुला काय पाहिजे बाबा?"

त्याला धड बोलता येत नव्हतें. भुकेनें त्याचे प्राण व्याकुळ झाले होते. खुणेनें आपली भुकेची व्यथा त्यानें जाणविली. नाथांस कळवळा आला. 'भूतदया हेंचि भांडवल संतां'. नाथांनीं तात्काळ आपली गृहलक्ष्मी गिरीजाबाई हिला भोजन तयार करण्यास सांगितलें. त्या माऊलीनें रात्र, अपरात्र कांहीं पाहिलें नाहीं. ती बाईबाईनें स्वयंपाकाच्या तयारीस लागली स्वयंपाक तयार होतांच ताट तयार करून उभयतांही त्या क्षुधिताकडे गेली व त्याच्यापुढें ताट ठेऊन भोजन करण्याची त्याला विनवणी केली. फार दिवसांनीं त्याला अन्न दृष्टीस पडलें. तो आधाशीपणें हात मारूं लागला. नाथांनीं त्याची स्थिति ओळखली. त्या स्थितींत फार खाणें अपायकारक हें ओळखून नाथांनीं पुढयांत बसून त्याला बेतानेंच जेऊं दिलें.

पोटांत अन्न जातांच व थोडा विसावा मिळतांच त्या गृहस्थाला हुषारी वाटून तो बोलूं लागला. त्यानें आपण होऊन कोणत्या स्थितींत तेथवर आलो तो सायंत इतिहास हळुहळु कथन

उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें 'लायसॉफ तेल' वापरा

केला, व शेवटीं म्हणाला, 'महाराज! मरूं घातलेल्या मला जीवदान दिलें! कुठें ठेऊं हे आपले उपकार!'

नाथानीं आश्वासन देऊन चांगली शक्ति येईपर्यंत तूं आमच्या वाड्यांत रहा. कांहीं चिंता करूं नकोस म्हणून सांगितलें. त्याचबरोबर तुरुंगाचे अधिकाऱ्यास कळवून त्याला माफी देवविली. नाथांनीं घरीं त्याची योग्य ती सेवासुश्रुषा करून त्याला चांगला ठणठणींत करून पाठविला. तो गृहस्थ प्रकृतिनें सुधारलाच परंतु मनानेंही सुधरून उद्योगधंद्यास लागला व ईश्वर-भजनांत काळ घालवूं लागला.

'जे का रंजले गांजले।
त्यासी म्हणे जो आपुले।
तोचि साधु ओळखावा।
देव तेथेंचि जाणावा॥'

नाथावरची खूण ही अशी होती.

• • •

## पंडित महाशयांचा आणखी एक नमुना

एका सदाचारसंपन्न बाईला एकच एक मुलगा होता. तेंच होतें तिचें सारें मांडवल. जगायचें किंवा धडपडायचें तें केवळ त्याच्यासाठीं! मौजीबंधन होईपर्यंत तो मुलगा बरा होता; परंतु त्यानंतर एकाएकीं त्याची दृष्टी गेली. केवढा धक्का बसला त्या बाईच्या मनाला! काय करावें हें तिला सुचेना. कोणाला शरण जावें; आपलें हें दुःख कोण दूर करील याचा विचार करीत ती आयुष्याचे दिवस कसेबसे ढकलीत होती.

तिचा हा भोग संपण्याचा काळ जवळ येत चालला होता. अक्कलकोटच्या महाराजांची कीर्ति तिच्या कानीं आली. त्यांच्या कथा ऐकून, या जगांत आपल्या दुःखाचा परिहार झाला तर त्यांच्याकडून होईल असें तिच्या मनाला वाटूं लागलें. त्यांच्या भेटीचा तिनें ध्यास घेतला.

एके दिवशीं मुलास घेऊन ती अक्कल-कोटच्या स्वामी समर्थांच्या दर्शनास गेली. मुलास महाराजांच्या पायांवर घालून आपली सर्व कर्मकहाणी त्यांना निवेदन केली. स्वामीसमर्थ म्हणजे दीनदुबळ्यांचे वाली व अनाथांचे नाथ! तिची हृदय-द्रावक् कथा ऐकून त्यांचें अंतःकरण द्रवलें. स्वामीजींनीं तिला अभय देऊन धीर धरून रहायला सांगितलें.

या जगांत उतावळेपणानें कांहीं होत नाहीं. श्रद्धा पाहिजे. त्याचप्रमाणें मनाला धीर धरून रहाण्याची संवय जडली पाहिजे. त्या बाईच्याठायीं या दोन्हीं गुणांची सुंदर जाड झालेली होती.

महाराजांच्या दर्शनासाठीं नाना प्रकारचे लोक येत असत. त्यांत त्यांची परीक्षा पहाण्यासाठीं आलेलेही कांहीं जण असत. या जगांत नाना प्रकारचे व नाना विचारांचे लोक आहेत. कोणाची श्रद्धा असते तर कोणाची नसते. कोणी चमत्कारांमुळें श्रद्धावान् बनतात तर कोणी चमत्कारांची चेष्टा करण्यांत पुरु-षार्थ मानतात. पूर्वसंस्कार व पूर्वसंचित जसें गांठीशीं असेल तशी त्याला भावना

व्हावयाची! दोन कोणी कोणाला द्यायचा!

त्या बाईचेंच उदाहरण पहा ना. ती आपल्या अंध पुत्रासह महाराजांवर सर्वभरिभार टेकून संपूर्ण श्रद्धायुक्त अंतःकरणानें आली. त्याच दरम्यान एक दोन नव्हे तर पांच अहंमन्य पंडीत महाशय महाराजांस आडवेतिडवे प्रश्न विचारून जमल्यास त्यांची टर उडवावी या उद्देशानें येत होते. महाराजांस त्यांच्या आगमनाची चाहूल लागल्यामुळें ते त्या बाईला उद्देशून म्हणाले 'माते थोडा धीर धर. तुझ्या सद्भावनेचें सुंदर फळ तुला मिळण्याची वेळ जवळ आली आहे. आतां थोड्याच वेळानें पांच पंडीतांचें येथें आगमन होईल आणि त्याचवेळीं तुझ्या चिरंजिवाच्या डोळ्यांचें पुनरागमन होईल.

ते पांच पंडीत महाराजांपुढें येऊन दाखल झाले. काय त्यांचा तोरा! त्यानीं नमस्कार करण्याचा साधा शिष्टाचारही पाळला नाहीं. आले आणि महाराजांसमोर मोठ्या ऐटींत बसले! महाराजास उद्देशून म्हणाले, 'आपणास कांहीं प्रश्न विचारून त्यांचा खुलासा करून घेण्यासाठीं आलों आहोंत आम्ही! त्यांचीं उत्तरें आपणाकडून मिळावीं अशी अपेक्षा आहे."

'आपणास प्रश्नांचीं उत्तरें पाहिजेत कां! मीच कशाला? हा माझ्याजवळ बसलेला मुलगाही आपले प्रश्न ओळखून त्यांचीं उत्तरें सफाईनें देईल! देशील ना रे बाळ?"

मुलानें महाराजांच्या पायांवर मस्तक ठेविलें, व म्हणाला, महाराज! मी सर्व परीनें परावलंबी व अज्ञानी आहें. मी बोलून चालून आंधळा! आपल्या कृपेनें जें काय होईल तें खरें!'

महाराजांनी आपल्या गळ्यांतील माळ काढून त्या मुलाच्या गळयांत घातली व जवळ पडलेल्या झेंडूच्या फुलांतील एक फूल उचलून व पाण्यांत बुडवून तें त्या मुलाच्या दोन्हीं डोळ्यांस लावतांच त्याला दृष्टिलाभ झाला. एवढेंच काय परंतु त्यांची अंतर्दृष्टीही फाकली. त्याला ज्ञाननेत्र प्राप्त झाले. महाराजाऐवजीं तो मुलगाच त्या पंचकडीबरोबर बोलूं लागला व वादविवाद करूं लागला. त्यानें त्यांच्या सर्व प्रश्नांची समर्पक उत्तरें देऊन त्यांच्या दांभीकपणाचा व अहंकाराचा बुडबुडा फोडून टाकला. त्या पांचही पंडितांस पश्चाताप झाला. आपण भलताच मूर्खपणा केला. लहान तोंडी मोठा घांस घेतला याबद्दल त्यांना दुःख झालें. त्यानें महाराजापाशी मोठ्या कळकळीनें क्षमेची याचना केली. शब्दपांडित्यापायीं त्यांचें जीवन मातीमोल झालें होतें. परिसाच्या सान्निध्यांत येतांच त्यांच्या जन्माचें सोनें झालें!

———

# 'रामदासीं नसावी ममता'

[ लेखक : अनंतराव मराठे, संस्थापक 'किरात', वेंगुर्लें ]

कित्येक लोक गीतेसारखीं किंवा भक्त-लीलामृतासारखीं पुस्तकें वाचावयाचीं झालीं तरी दुकानांतून पुस्तक विकत घ्यावयाचें, तें श्रीसाई बाबांच्या हातांत आणून द्यावयाचें, आणि त्यांचा प्रसाद म्हणून ग्रहण करून मग वाचायला आरंभ करावयाचा, असें करीत असत. सुप्रसिद्ध दासगणू यांनींही आपले ग्रंथ साईबाबांना अर्पण केले होते. बाबा कधीं कधीं असे ग्रंथ आले म्हणजे ते 'शामा'-कडे देऊन त्यांना घरीं बांधून ठेवण्यास सांगत.

## रामदासीबुवांचें पोथीवाचन

एकदां एक रामदासी बुवा शिरडीला आले. नित्य रामायणादि ग्रंथ वाचण्याचा त्यांचा नेम होता.

प्रातःकाळीं मुखमार्जन ।
स्नानसंध्या भस्मचर्चन ॥
करोनि भगवें वस्त्र परिधान ।
अनुष्ठान मांडावें ॥ १ ॥

विष्णुसहस्र नामावर्तन ।
मागून अध्यात्म रामायण ॥
पारायणावरी पारायण ।
श्रद्धापरिपूर्ण चालावें ॥ २ ॥

असेच ते एक दिवस मशिदींत वाचीत बसले असता बाबांच्या मनांत काय आलें कोणास ठाऊक! ते त्या रामदासाला जवळ बोलावून म्हणाले 'काय करावें बुवा! पोटांत कळ उठली आहे! थोडी सोनामुखीची पूड खाईन म्हणतों. जा थोडी घेऊन ये.'

रामदास वाचीत असलेल्या पोथींत खूण घालून सोनामुखी आणण्यासाठीं बाजारांत गेले.

## बहुगुणी पोथी

इकडे बाबांनीं काय केलें? ते आपल्या आसनावरून उठले आणि रामदास बसले होते तिथें गेले. त्यांना तिथें त्यांच्या इतर पोथ्यांत विष्णुसहस्रनामाची पोथी आढळली. ती उचलून त्यांनीं माधव-रावांना दिली. आणि त्यांना म्हणालेः—

'शामा, ही पोथी कनी ।
आहे पहा बहुगुणी ॥
म्हणून देतों तुजलागुनी ।
ती त्वां वाचून पहावी ॥ १ ॥

त्यांनीं आणखीही त्यांना सांगितलें कीं, मलाही पूर्वी एकदां पीडा होत होती त्यावेळीं विष्णु सहस्रनामांची पोथी घट्ट काळजाकडे धरली तेव्हां पिडा दूर

झाली. म्हणून सांगतों ही तुला घे आणि रोज वाचीत जा."

शामा म्हणतो– 'बाबा, मला ही नको. तो रामदास महाकोपिष्ठ आहे. तो म्हणेल मी ही चोरून घेतली. पण बाबा कांहीं ऐकेनात. त्यांनीं बळेंच ती शामाच्या खिशात कोंबली.

इतक्यांत रामदास सोनामुखी घेऊन आला. त्यांना ही पोथीची हकीकत कळली तेव्हा तो 'शामा'वर उखडला :

"पोटदुखीचें हें ढोंग सगळें।
तुवांच बाबांस उद्युक्त केलें
माझ्या पोथीवर तुझे डोळे।
हें न चले मजपुढें ॥ १ ॥

तुझा माझे पोथीवर डोळा।
स्वयेंच रचूनिया कपटाला।
घालिसी सकल बाबांचे गळा।
नामानिराळा राहून ॥ २ ॥

## बुवांची कानउघाडणी

इत्यादि प्रकारें तो 'शाम्याला खूप बोलला. माधवरावांनीं त्याला समजाविण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्याची समजूत पटेना. मग बाबाच पुढें झाले आणि म्हणालेः—

काय बिघडते रे रामदास।
व्यर्थ सायास कां वदासी ॥ १ ॥

अरे, शामा आपलाच पोरगा।
तूं कां शिरा ताणिसी उगा ? ॥

किमर्थ इतका कष्टसी बाऊगा।
तमाशा जगा दाविशी ? ॥ २ ॥

ऐसा कैसा तूं कलह तत्पर।
कां न बोलावें मधुरोत्तर ॥
अरे, ह्या पोथ्या पढताही निरंतर।
अजूनि अंतर अशुद्ध ॥ ३ ॥

**प्रत्यहीं अध्यात्म रामायण पढशी।**
**सहस्रनामाचें आवर्तन करिशी ॥**
**तरी ही उच्छृंखल वृत्ति न त्यजिसी।**
**आणि म्हणविशी रामदास ॥ ४ ॥**

ऐसा कैसा तूं रामदास।
तुवां सर्वार्थी असावें उदास ॥
परी तुटेना पोथीचा सोस।
काय या कर्मास सांगावें ? ॥ ५ ॥

रामदासीं नसावी ममता।
सान थोरीं असावी समता ॥
त्या तुझी या पोरासीं विषमता।
झोंबसी हाता पोथीस्तव ॥ ६ ॥

जा बैस जाऊनी स्थानावरी।
पोथ्या मिळतील पैशापावरी ॥
माणूस मिळेना आकल्पवरी।
विचार अंतरीं राखावा ॥ ७ ॥

## बुवा निवळले

बाबा इतकें बोलल्यावर रामदास निवळला; तरी पण त्यानें माधवरावांना (शामा) बजावलेंच कीं या 'विष्णुसहस्रनामा'बद्दल तूं मला 'पंचरत्न गीता' दिली पाहिजेस. माधवराव म्हणाले 'एकच काय तुला वाटल्यास दहा पंचरत्न गीता आणून देतों'

अशा रीतीनें हा तंटा मिटला आणि माधवराव नि रामदास उभयतांचेंही समाधान झालें.

---

# संत-वाणीचे अमोल बोल

## सुलभ अर्थबोध

(1) To fulfil God in life is man's manhood."

ही बाबू अरविंद घोष यांची उक्ती आहे वैदिक कालांतील ऋषि-मुनींच्या, गूढ (Mystic) सूत्रमय ऋचा समजायला भाष्यकाराना पुढें भाष्यें लिहावीं लागलीं. संतवाणीचेंही तसेंच आहे. हीच उक्ती पहा ना – सकृद्दर्शनीं दिसायला सोपी, पण यथार्थ अर्थ लावायला तितकीच कठीण ! चिंतन आणि मनन करून अशा संत वाणीचा अचूक अर्थ लावणें हा एक नाद आहे आणि त्यांत मनाला रंजन आहे. या नादानेंच माझे स्नेही अप्पा कुळकर्णी यांनीं मला दिलेल्या Words of Shri Arobindo या पुस्तकांतील ही पहिलीच उक्ती माझ्या वाचनांत येतांच, नित्याच्या सवयीप्रमाणें मनन होऊन, दोन अर्थ सुचले, पहिला – God म्हणजे Duties towards God असा अर्थ घेतला तर '**देवधर्माविषयींची तुझी कर्तव्यें तूं पार पाड म्हणजे हीच तुझ्या या जीवनांतील पुरुषार्थाची सफलता आहे,** असा अर्थ निघेल पण God या शब्दाचा अभिप्रेत अर्थ Divine will असा धरला तर मात्र याचा अर्थ अजिबात वेगळा लागण्याचाही संभव आहे. दुसरा अर्थ असा–कीं मानवी जीवनांत दैवी **संकेताची परिपूर्ती हीच त्याच्या पुरुषार्थ सिद्धीची व्याप्ती.'** हाच अर्थ अधिक सुलभरीतीनें कळावा या दृष्टीनें असें म्हणता येईल कीं माणूस जन्माला येतो तो जन्मजन्मींच्या संचिताचें गाठोडें सोबत घेऊन येतो आणि याच पूर्व संचितानुसार **ब्रह्मदेव** त्याचा ललाट लेख लिहितो तो पुढें त्यालाही पुसतां येत नाहीं. दैवीसंकेत तो हाच आणि हीच त्याच्या पुरुषार्थसिद्धीची परिसीमा. या पलीकडे पुरुषार्थ साधण्याच्या त्याच्या वल्गना हा मानवी अहंकार आहे आणि तो फोल आहे. हा दुसरा अर्थ बरोबर असो वा चूक असो, एक गोष्ट अनुभवानें पटते ती ही कीं ऐन तारुण्यातील महत्त्वाकांक्षी आणि ध्येयवादी तरुणांची कार्यकर्तृत्वाची उडी पूर्व संकल्पाप्रमाणें तशी व तितकी अचूक पडेलच असा भरवसा नसतो. उलट अनेक वेळीं ती पडतही नाहीं. जन्मजन्मींच्या ऋणानुबंधानें नव्या नव्या मित्रांच्या व सहकाऱ्यांच्या गांठीभेटी वा ताटातूटी होऊन, एका घटनेंतून दुसरी, दुसरीतून तिसरी अशा घडामोडी होत

होत, त्याचें वैयक्तिक जीवनांतील पाऊल पडत असतां, जें कांहीं प्रत्यक्षांत घडायचें ते नियतीच्या योजनेनेंच घडायचें असल्यामुळें, ईश संकेताबाहेर अनपेक्षित भाग्योदय लाभण्याचा संभव नसतो—म्हणजेच संकल्पित कार्यक्षेत्रांत अपेक्षित उंच उंडी पडेलच, अशीही शक्यता नसते.

अरविंद बाबूंच्या वरील उक्तीचा हा दुसरा अर्थच मला अधिक पटतो. याला कारणे दोन. या अर्थाला पुष्टी मिळेल अशी भागवत सांप्रदायी प्राचीन, संतकवींच्या काव्यांतील साम्यस्थळें.

(१) 'ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें' ही उक्तिही या अर्थानें जन्मोजन्मींच्या पापपुण्यानुसार ब्रह्मदेवानें आपला जो ललाट–लेख लिहिला असेल त्यासंचितानुसार जे सुखदुःखाचे प्रसंग आपल्या जीवनांत येतील ते सहर्ष भोगावे—त्यानें विषाद मानूं नये. कारण तें आपलेच संचिताचें अटळ फळ होय–'ठेविलें अनन्ते' या उक्तींतून मी काढलेला हा अर्थ, अर्थाची ओढाताण करून काढलेला आहे अशी कुणी शंका घेईल त्याला माझें उत्तर एवढेंच कीं देव न्यायी आहे आणि तो एकाला सुखांत ठेवतो आणि दुसऱ्याला दुःखांत लोटतो असें म्हणणें हें त्याच्या न्यायीपणाला कमीपणा आणणारें होईल. अर्थात देव त्याला ज्या स्थितींत ठेवतो तो त्या त्या व्यक्तीच्या कर्माचेंच फळ होय असें मानणेंच युक्त व इष्ट होईल, असें मी तरी समजतो. माझ्या या विधानाला समर्थ रामदासांच्या खालील उक्तीनें अगदीं स्पष्ट शब्दांत पुष्टी मिळते.

वेगीं होईं सावधान ।
करी देवाचें भजन
गती न कळे होणाराची ।
ही का इच्छा भगवंताची ।
पूर्व संचिताचें फळ ।
हाती दुःखाचे कल्लोळ
पूर्वी केलें जें संचित ।
तें तें भोगावें निश्चित
दास म्हणे पूर्व-रेखा ।
प्राक्तन न टळ ब्रह्मादिकां ॥

(२) आतां दुसरें कारण माझ्या जीवनांत मला आलेला आत्मानुभव ..."गतिमध्यें एक सुंदर रूपक आहे. नदीच्या प्रवाहात जसें लाकडाचे ओंढे तसेंच जीवाला जीवन प्रवाहांत वहात येतात. एकमेकाला मिळतात, आणि पुढें अलग होऊन त्याच प्रवाहांत वहात जातात. माझ्या जीवनांतही जन्मजन्मींच्या ऋणानुबंधनानें कांहीं मित्रांच्या आणि सहकाऱ्यांच्या अनपेक्षित गाठीभेटी झाल्या त्यांच्यांत सहकार्यानें ध्येय वादाच्या नव्या नव्या क्षेत्रांत पदार्पण करून संस्था काढून प्रगतीच्या मार्गानें सार्वजनिक जीवन व्यतीत करीत असतां ऋणानुबंध संपताच त्यांच्यापैकीं काहींच्या ताटातुटी होऊन, आमच्या साऱ्या आकांक्षा विफल झाल्या—या पूर्वकालीन सुखद व दुःखद आठवणी आठवल्या म्हणजे अरविंदबाबूंच्या उक्तीचा दुसरा अर्थ किती सार्थ आहे, हें स्वानुभवानें निदान मला तरी पटतें" (अवतरण चिन्हांत दिलेला हा शेवटचा परिच्छेद मी लिहित असलेल्या माझ्या 'जीवन–स्मरणी' या अप्रकाशित आत्मचरित्रांतील आहे)

—प्रा. आबा शेट्ये.

# देव भावाचा भुकेला

मी माझिया भक्ताचा अंकिला । आहे पासींच उभा ठाकला ॥
प्रेमाचा मी सदा भुकेला । हांक हांकेला देतसे ॥ ७६ ॥

श्रीसाईसच्चरित अ. ११

**प्रेमानें ओथंबलेलें निर्मळ अंतःकरण व निष्काम भक्तिभाव जवळ असला म्हणजे देवही सदासर्वकाळ आपल्या सन्निध असतो. त्याला दूर जातांच येत नाहीं संत जनाबाईचें जीवन भक्तिभावानें सदासर्वकाळ ओथंबलेलें होतें. येथें तिच्या भक्ती माधुरीचा थोडासा आस्वाद आपण घेऊं शकाल.**

आमचें मुंबई सरकार संत वाङ्मयाचें संशोधन करून तें सुंदर व स्वस्त स्वरूपांत प्रसिद्ध करूं लागलें आहे, ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. स्वातंत्र्याचा हाच तर मोटा फायदा असतो. तुकाराम महाराजांचे अभंग व चरित्र (पहिला खंड) यापूर्वीच प्रसिद्ध झालें असून ज्ञानेश्वरीची संशोधित आवृत्ती ही प्रसिद्ध व्हावयाची आहे. त्याचप्रमाणें ज्ञानदेवकालीन संत नामदेव यांच्या अभंग ओव्यांचें संशोधन करून त्याचें प्रसिद्धिकरण करण्यासाठीं मुंबई सरकारनें नुकतीच एक समिती नेमून तिच्याकडे हें कार्य सोपविलें आहे. त्याचप्रमाणें 'नामयाची दासी' स्वतःस म्हणवून घेणारी व त्यांच्या सहवासांत लहानाची मोठी झालेली, एवढेंच नव्हे तर निष्काम भक्तीनें अत्यंत थोरपदास पोहोंचलेली संत जनाबाई हिच्याही अभंगांचें संशोधन करून ते साधे, सरळ व भक्तिभावानें ओथंबलेले अभंग सर्वांना स्वल्प किंमतींत मिळतील अशी व्यवस्था होणें जरूर आहे. संत नामदेवांच्या अभंगांचें संशोधन करणाऱ्या समितीचें या विनंतीकडे लक्ष जाईल अशी आशा आहे.

## देवबाप्पा हेंच सर्वस्व

सहाशें वर्षांपूर्वींच्या ज्ञानदेव, नामदेव यांच्या काळांत जनाबाईचा जन्म नर्मदा-तटाकीं असलेल्या गंगाखेड नामक खेड्यांत एका शूद्र कुटुंबांत झाला. संतांना कसली आली आहे जात!

तिचे आईवडील विठ्ठलभक्त होते. दर वर्षी पंढरीची वारी करून विठोबाचें दर्शन घेत असत. बालपणापासून जनाबाईचा देवभक्तीकडे ओढा. भावभक्तीचें तिला लेणें जन्मतःच प्राप्त झालें होतें. बाल्यसुलभ खेळाकडे किंवा कशाहीकडे तिचें लक्ष नव्हतें. 'देवबाप्पा' हेंच तिचें सर्वस्व होऊन राहिलें होतें.

जनाबाई पांच वर्षांची असतां आपल्या मातापित्याबरोबर पंढरपुरला गेली. तेथें ती इतकी रमली कीं, विटोबाला सोडून घरीं जाणें तिला परवडेना. आईबापांचा निरुपाय झाला. त्यांनीं नानाप्रकारें समजूत घालण्याचा प्रयत्न केला; परंतु त्या बालवयांत नेहमीं विठ्ठलाच्या पायांजवळ रहाण्याचा तिनें जो निर्णय घेतला तो कायमचाच.

## नामदेवाच्या कुटुंबांत

अशा स्थितींत काय करणार? नामदेवाचे वडील दामाशेटजी यांची व जनाबाईच्या वडिलांची चांगली ओळख होती. त्या कुटुंबांत ती राहू लागली. संत नामदेवासारख्या भगवद्भक्ताचा अखंड सहवास तिला घडावा व त्यांच्या सेवेंत तिनें जीवन घालवावें अशी जणू काय ईश्वरी योजना होती. लहानपणापासून त्या कुटुंबाच्या सेवेला ती निष्ठापूर्वक लागली घरांतील सारीं कष्टाचीं कामें विठ्ठलाचें नांव घेत घेत तिनें आनंदानें पार पाडावीं.

सदासर्वकाळ ध्यानींमनीं विठोबा. कोणतेंही काम कमी मानायचें नाहीं. परंतु जें जें करायचें तें विठ्ठलाच्या नावें करावयाचें. कशाचाही लोभ नाहीं, अहंकार नाहीं किंवा हव्यास नाहीं. कामांत कधीं कुचराई करायची नाहीं आणि विठोबाला क्षणभरही विसरायचें नाहीं. मग विठोबाला तरी तिचा—आपल्या एकनिष्ठ भक्ताचा विसर कसा पडावा?

आधीच उल्हास! विठोबाच्या विचारांनीं मन भरून म्हणा वा भारून म्हणा, गेलेलें. त्यांत नामदेवांचा सहवास घडला. त्यामुळें भावभक्तीचें रोपटें दिवसेंदिवस जोमानें वाढूं लागलें. त्याला जरूर तें खतपाणी पडूं लागलें. मग तें रोपटें कां नाहीं वाढणार? आपल्या एका अभंगांत जनाबाई म्हणते, 'जनी म्हणे जोड झाली विठोबाची। दासी नामयाची म्हणोनियां'

## एकच एक मनकामना

नामदेवामुळें, त्याची एकनिष्ठेनें सेवा करतां करतां विठोबाच्या गांठीभेटी झाल्या असें तिनें कृतज्ञतापूर्वक म्हटलें आहे. जनाबाईला आयुष्यांत इच्छा, आकांक्षा कसलीच नव्हती. ती आजन्म अविवाहित राहिली; तिची मनकामना एकच होती. मला भगवन्ताचें सान्निध्य अखंड लाभावें, त्याच्यापासून एक क्षणही दूर राहूं नये. ती म्हणते,

'हेंचि देई हृषीकेशी।
तुझें नाम अहर्निशीं ॥
रूप न्याहाळीन डोळां।
पुढें नाचेन वेळोवेळां ॥
सर्वांठायीं तुज पाहें।
ऐसें देऊनि करीं साहे ॥
धांवा करितां रात्र झाली।
दासी जनीसी भेट दिली ॥'

भगवंतानेंही तिची इच्छा परिपूर्ण केली. तो तिच्याबरोबर सदासर्वकाळ राहिला व वावरला. केवढें तिचें भाग्य! तिच्यासाठीं त्यानें गोवऱ्या वेचल्या. तिच्यासाठीं त्यानें दळण दळलें. तिच्यासाठीं त्यानें धुणी धू धू धुतलीं. तिच्यासाठीं त्यानें पाणी भरलें आणि काय नाहीं केलें! तिची माता होऊन तिचे केस विंचरले; तिची वेणी-फणीही केली!

या सर्व गोष्टींची साक्ष तिचे अभंगच देताहेत!

## सदासर्वकाळ देवाची संगत

पाणी आणावया गेली।
तिच्यामागें धांव घाली॥
घागर घेऊनी हातांत।
पाणी आंती राजणात॥
शेणी वेचूं गेलें राना।
पाठीमोरा उभा कान्हा॥
आपुले हातीं वेणी घाली।
जनी म्हणे माय झाली॥

जनाबाई एकदां मुसळ घेऊन धान्य कांडीत होती. तें केव्हां व कधीं संपणार याची चिंता तिच्यापेक्षां तिच्या विठोबाला! हातां आले फोड। जनी म्हणे मुसळ सोड॥ असा भगवन्त तिच्याबरोबर सतत वावरत होता.

जनाबाईनें पहांटेच्या प्रहरीं उठावें व भगवन्ताचें गीत मनोभावें गातां गातां दळण दळावें. तशा त्या वेळेंही भगवन्त तिला सहाय्य करण्यासाठीं असेल तेथून धांवत येत असे व तिला साथ देत असे. तिच्या सुराशीं सूर मिळवीत गाणींही म्हणत असे. एकदां मोठी मौज झाली. जनाबाईला पहांटेच्या प्रहरीं मदत करण्यासाठीं कोणी तरी परपुरुष आलेला आहे असें दुसऱ्या पुरुषी आवाजावरून नामदेवाची आई गोणाई हिनें ताडलें. हळूच जाऊन पहाते तों तेथें कोणी पुरुष नसून एक बाईच आहे असें तिला दिसून आलें.

'काय ग तुझं नांव?'

'माझं नांव व्हय? माझं नांव इठाबाई!

गोणाई आश्चर्यानें थक्क झाली, शरमली. नामदेवाला सांगूं लागली तेव्हां त्यानें ती विठाबाई नसून तो साक्षात् विठ्ठल परमात्मा आहे असल्याचें त्यानें सांगितलें!

एकलीच गाणें गात।
दुजा साद उमटत॥
कोण गे तुझे बरोबरी।
गाणें गातो तुझे घरीं॥
म्हूण कळली नामदेवा।
विठ्ठल जनीचिया भावा॥

## देव अंकित कसा झाला?

देव जनाबाईच्या इतका अंकित कसा झाला? कारण तिच्याठायीं भक्तिभावाची लयलूट झाली होती. भक्तिभावानें तिचें अंतःकरण ओतप्रोत भरून गेलें होतें. प्रत्येक गोष्ट ती ईश्वरार्पण बुद्धीनें करीत असे. भगवंताशीं तिचें तादात्म्य झालें होतें. उगाच का हें घडतें? तिची पूर्वपुण्याई तशीच थोर होती. आपलें प्रत्येक पाऊल ती विठ्ठलाच्या नावानें टाकीत होती. खातां, पितां, जेवतां, अशनीं, शयनीं तिला देव आठवत होता. दुसरें काहीं नाहीं.

देव खातें देव पितें ।
देवावरी मी निजतें ॥
देव देतें देवा घेतें ।
देवासवें व्यवहारितें ॥
देव येथें देव तेथें ।
देवावाण नाहीं रितें ॥
जनी म्हणे विठाबाई ।
भरूनि उरली अंतर्बाही ॥

अशा प्रकारची तिची एकतानवृत्ता झालेली होती तिची भक्ति किती प्रखर होती, हें शब्दांनीं वर्णन करून सांगणें कठीण आहे. त्यामुळें देव असेल तेथून तिच्या हांकेला धांवत येत असे. तिचा सहकारी होत असे. तिचा शब्द कधींही पडूं देत नसे तिनें आपलें सर्वस्व देवाला अर्पण केलें होतें. कधीं कधीं देवाच्या भेटीसाठीं व्याकुळ होऊन लहान मूल जसें मातेसाठीं रडतें तशी ती रडत असे.

तुजवीण काय करूं ।
प्राण किती कंठीं धरूं ॥
आतां जीव जाऊं पाहे ।
धांव घाली माझे माये ॥

आणि मग जनाबाईची 'माय' धांवत येऊन तिला दर्शन देत असे; तसेंच यापूर्वीच सांगितल्याप्रमाणें त्या भक्ति-बळामुळें—

**"दळण कांडण धुणें धोवुनि, पाटी डोईवरी। गोवऱ्या वेचुनि आणि घरीं ॥**

येथवर भावाचा भुकेला देव तिचा अंकित झाला होता.

## आश्चर्यकारक चमत्कार

अनेक साधुसंतांच्या जीवनांत नाना प्रकारच्या आश्चर्यकारक व चमत्कृतीपूर्ण घटना घडल्याचें आपण ऐकतों व वाचतों त्याचप्रमाणें जनाबाईच्या जीवनांतही तशा घटना घडल्याचें नमूद आहे. त्यांपैकीं एका घटनेचा येथें उल्लेख करणें जरूर वाटतें. एकदां भल्या पहांटेच्या प्रहरीं जनाबाई दळण दळीत बसली होती. विठोबाही तिच्याबरोबर दळण दळूं लागले व तिच्या सुरांत सूर मिळवून गीतें गाऊं लागले. गातां गातां वेळेचें भान राहिलें नाहीं. काकडआरतीची वेळ झाली. मंदिरांत विठ्ठलमूर्ति नाहीं हें पाहून भक्तांना काय वाटेल ही चिंता जनाबाईला! तिनें घाईघाईत विठोबाला मंदिरांत पाठविलें. अंगावर जनाबाईची गोधडी होती, तीही घाईत त्यांच्या अंगावर राहिली. आरतीच्यावेळीं विठोबाच्या अंगावर गोधडी आढळून आली तेव्हां तेथील ब्राह्मण मंडळीस आश्चर्य वाटलें. तपासाअंतीं ती गोधडी जनाबाईची असल्याचें समजून आलें. गळयांत सोन्याचें पदक असलेला कंठाही नव्हता. जनाबाईच्या घरीं तो घाईत राहून गेला होता. तिच्या घरच्या झडतींत तो सांपडला. मग काय? आयता पुरावाच हातीं लागला होता. जनाबाईनें देवाचा कंठा चोरला व तो गुन्हा उघडकीस येऊं नये म्हणून तिनें देवावर गोधडीनें पांघरूण घातलें असा आरोप ठेऊन तिला देहदंडाची शिक्षा ठोठावण्यांत आली. एक शूळ तयार करण्यात येऊन तिला तेथें नेऊन उभी करण्यांत आलें. तिनें मनोभावें प्रार्थना सुरू केली.

कां गा न येसी विठ्ठला ।
ऐसा कोण दोष मला ।
मायबाप तूंचि धणी ।
मला संभाळी निर्वाणी ॥

त्वां बा उद्धरिले थोर ।
तेथें कोण मी पामर ॥
दीनानाथा दीनबंधू ।
जनी म्हणे कृपासिंधू ॥

तिची प्रार्थना संपली आणि पहातात तों काय ! तेथें वधस्तंभ नव्हता, तर झुळझुळ पाण्याचा प्रवाह वाहत होता ! सर्वांना आश्चर्य वाटलें व जनाबाईच्या भावभक्तीची सर्वांना खूणगांठ पटली.

असे अनेक चमत्कार जनाबाईच्या जीवनांत घडून आले आहेत. त्यांचें कारण एकच. जनाबाईचा भक्तिभाव खंबीर होता. ती खुंटी तिनें हालवून हालवून बळकट करून ठेवली होती. भगवान् तिच्या हांकेला ओ देऊन वेळीं अवेळीं तिच्या घरीं यायचे. आपल्या घरीं धड वस्त्र नाहीं, बसायला आसन नाहीं, देवाचें आगत–स्वागत कसें करायचें ही चिंता तिला नेहमीं लागून राहिलेली असायची. ती म्हणते,

मोडकीशी बाज ।
त्यावर वाकळाची सेज ॥
वुज सुकुमाराशीं नीज ।
कैशी येईल रे विठोबा ॥
फुटकासा तांब्या ।
कैसा उदक पिशी बा ॥
वाळलें, चिळलें, कुटकें ।
शिळें आणि तुटकें ॥
मज दासी जनी घरींचें विटकें ।
खाशी रे विठोबा ॥

यांत जनाबाईचें साधें, सरळ, निर्मळ व प्रेमळ अंतःकरण दिसून येत आहे. भाषा साधीभोळी, परंतु अंतःकरणाचा भेद घेणारी आहे. या अशा सरळ, प्रेमळ व निष्काम भावामुळें देव तिचा झाला. तिनें न मागतां तिच्या साऱ्या इच्छा त्यानें पुरविल्या. प्रयाणापूर्वीच्या एका अभंगांत जनाबाई म्हणते–

माझे मनीं जें जें होतें ।
तें तें दिधलें अनंतें ॥

आषाढ कृ. त्रयोदशी सं. १२५० रोजीं जनाबाई समाधिस्थ झाली !

---

प्रख्यात मिल्सचें सर्व प्रकारचें कापड
सर्वोत्कृष्ट डिझाईन्स माफक
भावांत खरेदी करा

पी. मधुकर (क्लॉथ मर्चंटस)

बोरकर वाडी, रानडे रोड, दादर, मुंबई २८

# ‘ शस्त्रधाऱ्यांतील श्रेष्ठ श्रीराम मीच आहें ’

( लेखक : सदानंद महादेव ठाकूर, वकील रत्नागिरी )

श्रीसाईबाबांनीं आपल्या महायानाच्यापूर्वी श्री रामचंद्रप्रभूचें नाव कानीं पडावें अशी व्यवस्था केली होती. यावरून श्री रामचंद्र प्रभूबद्दल त्यांना किती आदर वाटत होता हें स्पष्ट होतें. श्रीकृष्ण भगवंतानींही गीतेंत आपल्या विभूतिमत्वाचें वर्णन करतांना ‘राम शस्त्र भृतामहम्’ असें म्हटलें आहे तें कां? याचें विवरण या लेखांत करण्यांत आलें आहे.

(१) वक्तुमर्हस्य शेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः ।
याभिर्विभूतिभिर्लोकानिमांस्त्वं व्याप्य तिष्ठसि ॥ गीता अध्याय १० श्लोक १६

(२) कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिन्तयन् ।
केषु केषुच भावेषु चिन्त्योसि भगवन्मया ॥ गीता अध्याय १० श्लोक १७

(३) पवनः पवतां अस्मि रामः शस्त्रभृतामहम् ।
झषाणां मकरश्चास्मि स्रोतसांमास्मि जान्हवी ॥ गीता अध्याय १० श्लोक ३१

गीतेच्या १० व्या अध्यायांतील वर लिहिलेले श्लोक नं. १६ व १७ मध्यें अर्जुनानें ‘ तुमच्या ज्या दिव्य विभूति आहेत, ज्या विभूतिनीं हे सर्व लोक व्यापून तुम्ही राहिलां आहांत त्या आपण मला पूर्ण सांगा. हे योगिन्, सदा तुमचें चिंतन करीत असतां तुम्हांला मी कसें ओळखावें आणि हे भगवान् कोणकोणत्या पदार्थांमध्यें मी तुमचें चिंतन करावें तें मला सांगा ” अशी विनंति श्री भगवानांना केली आहे. आपल्या परमप्रिय भक्तानें केलेल्या विनंतीला उत्तर म्हणून १० व्या अध्यायामध्यें भगवंतानीं आपल्या विभूति सांगितल्या आहेत. उदा. (१) सर्व भूतांच्या अंतरीं असणारा आत्मा मी आहें (२) नक्षत्रांत चंद्रमा मी आहें (३) पर्वतांमध्यें मेरू पर्वत मी आहें (४) वृक्षांमध्यें अश्वत्थ म्हणजे पिंपळ मी आहें (५) गंधर्वांमध्यें चित्ररथगंधर्व मी आहें (६) शस्त्रांमध्यें वज्र मी आहें (७) गाईमध्यें कामधेनू मी आहें. (८) पांडवांमध्यें धनंजय मी आहें; वगैरे

आपल्या अनेक विभूति सांगितल्या. व या सांगतांना वर श्लोक ३१मध्यें म्हटल्याप्रमाणें शस्त्र धारण करणाऱ्यामध्यें आपण राम असल्याचेंही सांगितलें आहे.

## एकबाणी गुणालाच महत्व कां ?

या विभूतींच्या उल्लेखाच्या बाबतींत दोन प्रश्न प्रामुख्यानें नजरसमोर येतात. पहिला प्रश्न—वरील श्लोकांतील श्लोक नं. १६ मध्यें सर्व लोक व्यापून तुम्हीं राहिलां आहां असें अर्जुनानें भगवानाना म्हटलें आहे, तें विधान त्यानें कोणत्या आधारावर केलें व दुसरा प्रश्न श्री भगवानानीं रामचंद्रप्रभूंच्या बाबतींत एक पत्निव्रत धारण करणाऱ्यामध्यें मी राम आहें अगर एकवचनी महात्म्यामध्यें मी राम आहे असें न म्हणतां श्रीरामचंद्र प्रभूंच्या एक स्त्री, एकवचनी व एकबाणी या तीन दैवी गुणांपैकीं एकबाणी गुणालाच अधीक महत्त्व देऊन रामःशस्त्र भृतामहम् असें कां म्हटलें ?

वरील दोन प्रश्नांपैकीं पहिल्या प्रश्नाचा विचार करतांना अध्याय नं. १० च्या श्लोक नं. १६ मध्यें "सर्व लोक व्यापून तुम्हीं राहिला आहांत" असें निदान श्रीभगवानांबद्दल केलें आहे त्या १० व्या अध्यायाच्या श्लोक नं. १६ पूर्वी याबाबतींत कांहीं विवरण आलें आहे कीं काय त्याचा विचार आपणाला प्रथम करावा लागेल. तो विचार करतांना आपणाला असें दिसून येतें कीं, अध्याय नं. १० तील सदर श्लोक नं. १६ पूर्वी अनेक वेळां आपल्या विश्वव्यापित्वाचा उल्लेख भगवानानीं केला होता. उदा० गीतेच्या चौथ्या अध्यायांतील श्लोक नं. ३५ मध्यें ज्ञानाची महती सांगतांना "या ज्ञानानें संपूर्ण सृष्टी तूं आपल्यांत व नंतर माझ्यांतही पहाशील असें भगवंतानीं म्हटलें आहे. अध्याय नं. ६ श्लोक नं. ३० मध्यें "जो पुरुष सर्वत्र मला पाहतो व माझ्याठायीं सर्व पहातो त्याला मी कधीं अंतरणार नाहीं; व तो मला कधीं अंतरत नाहीं," असें भगवंत म्हणाले आहेत. अध्याय ७ श्लोक नं. १० मध्यें 'सर्व पदार्थांचें अनादिबीज मी आहें,' असें भगवंतानीं सांगितलें आहे. अध्याय नं. ९ श्लोक नं. ४ मध्यें 'मी आपल्या अव्यक्त स्वरूपानें हें जग व्यापिलें आहे व माझ्याठायीं सर्व भूतें आहेत' असें भगवान म्हणाले आहेत. त्याचप्रमाणें अध्याय नं. १० च्या सुरवातीला श्लोक नं. ८ मध्यें 'मी सर्वांचें उत्पत्ति स्थान असून माझ्यामुळें सर्व जग कार्यांत प्रवृत्त होतें' असें सांगून जगाच्या उत्पत्तीला व कार्य प्रवृत्तीला आपणच कारण असल्याचें भगवंतानीं सांगितलें आहे. अर्जुनाच्या मनांत भगवंताच्या विश्वव्यापित्वाची भावना दृढमूल व्हावी म्हणून तोच विषय वर लिहिल्याप्रमाणें अनेक वेळां अर्जुनाला निरनिराळ्या तऱ्हेनें समजावून सांगण्यांत आला होता व त्यामुळें परमेश्वर सर्व चराचर वस्तू व्यापून राहिला आहे हीं श्री भगवानाची शिकवण

उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें 'लायसॉफ तेल' वापरा

अर्जुनाच्या मनावर पूर्णपणें बिंबली होती; परंतु ईश्वर सर्व चराचर वस्तूमध्यें आहे हें नुसतें समजून घेऊन अर्जुनाच्या जिज्ञासू मनाची तृप्तता होणें शक्य नव्हतें. सर्व चराचर वस्तूंत भरून राहिलेला परमेश्वर ओळखतां आल्याशिवाय त्याचें चिंतन व भक्ति करणें सुलभ जाणार नाहीं, याची अर्जुनाच्या मनाला जाणीव होती व त्यामुळेंच अर्जुनानें या लेखाच्या सुरवातीला उधृत केलेल्या सोळा व सतराव्या श्लोकांतील शंका भगवानांना विचारिली आहे व चराचर कसें ओळखावें व तुमचें चिंतन कसें करावें असा प्रश्न विचारला आहे. अर्जुनानें केलेल्या प्रश्नाचें उत्तर देतांना आपलें विश्वव्यापिकत्व अर्जुनाच्या ध्यानांत स्पष्टपणें यावें म्हणून आपल्या विभूतींपैकीं कांहीं महत्त्वाच्या विभूति भगवंतांनीं अर्जुनाला सांगितल्या व अखेर अध्याय नं. १० च्या श्लोक नं. ४१ मध्यें—

यद्यद्विभुति मत् सत्वं
श्रीमदूर्जित मेववा।
तत्त देवाव गच्छत्वं मम
ते जो ऽ स संभवम्॥

"जी जी वस्तू, वैभव, लक्ष्मी किंवा प्रभाव यांनीं युक्त आहे; ती ती माझ्या तेजाच्या अंशापासून झाली आहे असें तूं समज." असें सांगून आपलें विभूतिमत्त्व ओळखण्याची खूण अर्जुनाला दाखवून दिली आहे. व अशा तऱ्हेनें श्लोक नं. १६ व १७ यांत अर्जुनानें विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर श्रीभगवानांनीं त्याला विशद करून सांगितलें आहे.

## मन गुंग करणारा प्रश्न

वर उल्लेख केलेल्या प्रश्नांपैकीं दुसरा प्रश्न म्हणजे श्रीरामचंद्रप्रभूंच्या ज्या तीन दिव्य गुणांबद्दल हें सर्व जग हजारों वर्षें त्यांचें पूजन व चिंतन करीत असतें त्या तीन गुणांपैकीं म्हणजे एकपत्नीव्रत, एकवचनी व्रत व एकबाणी व्रत यापैकीं आपली विभूति ओळखतांना श्रीरामचंद्रप्रभूंच्या पहिल्या दोन गुणांचा म्हणजे एकपत्नीव्रताचा व एकवचनीव्रताचा समावेश न करतां त्यांच्या एकबाणी व्रतालाच भगवानांनीं विभूतीमत्त्वांत स्थान देऊन आपल्याला ओळखण्याची खूण म्हणून शस्त्र धारण करणाऱ्यांमध्यें आपण राम आहे असें कां म्हटलें हा प्रश्न मन गुंग करून टाकतो. व श्रीरामचंद्रप्रभूंच्या एकपत्नी व एकवचनी या दोन गुणांपेक्षां एकबाणी या तिसऱ्या गुणाला अधिक महत्त्व भगवंतानीं कां दिलें हें समजून घेण्याची इच्छा उत्पन्न होते. सदर प्रश्नाचा विचार करतांना श्रीरामचंद्रप्रभूंना परमेश्वराचे एक अवतार मानलें जात होतें, ही गोष्ट आपण प्रामुख्यानें लक्षांत ठवली पाहिजे.

गीतेच्या चौथ्या अध्यायांत श्लोक सात व आठ मध्यें भगवंतानीं अर्जुनाला आपण अवतार केव्हां व कशासाठीं घेतों, याचा खुलासा केला आहे. सदर दोन श्लोकांत भगवान म्हणतात, 'हे भारता! जेव्हां जेव्हां धर्माची ग्लानि होऊन अधर्माचें प्राबल्य माजतें तेव्हां तेव्हां मी आपण स्वतःच अवतार घेत असतों. साधूंच्या संरक्षणार्थ, दुष्टांचा

नाश करण्याकरितां व धर्म संस्थापनेसाठीं युगायुगामध्यें मी जन्म घेत असतों.” श्रीरामचंद्रप्रभूंना परमेश्वराचे अवतार मानावयाचें म्हणजे त्यांचे जीवितकार्य वर लिहिलेल्या गीतेच्या ७।८ श्लोकांतील कारणांकरितां असलें पाहिजे हें उघड आहे.

श्रीरामचंद्रप्रभूंच्या ठायीं एकपत्नी-व्रताचा महान् गुण होता व त्याकरितां ते सर्व जगाला वंद्यही आहेत. श्रीरामचंद्र-प्रभूंच्या या उच्च ध्येयास अनुसरूनच शिवरायांनीं वसईहून पकडून आणलेल्या पोर्तुगीज महिलेला ‘तूं माझी माता असतीस तर मी देखील तुझ्या तुझ्यासारखा सुंदर झालों असतों’ असें म्हणून तिचा गौरव केला व तिची बंध-मुक्तता केली. ही इतिहासप्रसिद्ध घटना सर्वांना माहितच आहे. एकपत्नीव्रत धारण करणाऱ्या विभूतींना मानवाच्या आध्या-त्मिक प्रगतीच्या आड येणारे जे मुख्य तीन शत्रू काम, क्रोध, लोभ त्या तिघांपैकीं सर्व प्रमुख शत्रूला म्हणजे कामाला प्रथम जिंकावें लागतें. कामजयाचें व्रत हें आच-रण्यास अत्यंत कठिण असल्यामुळें एक-पत्नीव्रत फार पवित्र व उच्च दर्जाचें मानलें जातें. परंतु कांहीं झालें तरी एकपत्नीव्रत हा ज्या त्या इसमाचा व्यक्तिगत प्रश्न असून अवतार कार्याच्या धर्म संस्थापना, दुष्टाचा नाश वगैरे वर श्लोक ७ वा यांत वर्णिलेल्या ध्येयांत त्याचा समावेश होत नाहीं. व म्हणूनच आपली विभूति सांगतांना श्रीरामचंद्रप्रभूंच्या एकपत्नीव्रताला भग-वंतांनीं वगळलें असलें पाहिजे, असें वाटतें.

## श्रीरामचंद्राचा एकवचनीपणा

श्रीरामचंद्रप्रभूंचा सर्वांस वंद्य व आदरणीय असा दुसरा महान् गुण म्हणजे एकवचनीपणा. सदरचा गुण ज्या महात्म्यांना लाभलेला असतो ते आपल्या तोंडून गेलेला प्रत्येक शब्द कितीही संकटें आलीं तरी खोटा पाडणार नाहींत. व सदर गुणामुळें ते सर्व जगाला वंद्य असतात. ही गोष्ट निःसंशय खरी असली तरी एकवचनी पणाच्या गुणामुळें त्या त्या व्यक्तीची उन्नति होत असते. सदरहू गुणाचा समावेश वर उल्लेख केलेल्या श्लोक नं. ७ व ८ मधील अवतार कार्यास जरूर असलेल्या धर्म संस्थापना, दुष्टांचा प्रतिग्रह, वगैरे गुणांत होत नाहीं व त्यामुळें एकवचनी गुणाचा समावेश आपल्या विभूतींत भगवानानीं केला नसावा असें वाटतें.

## त्या विशिष्ट गुणालाच महत्त्व कां ?

शस्त्र धारण करणारांमध्यें मी राम आहे असें भगवंतांनीं या लेखाच्या सुरुवातीला लिहिलेल्या गीतेच्या अध्याय १० श्लोक ३१ मध्यें म्हटलें आहे व श्रीरामचंद्रप्रभूंच्या एकबाणी व्रताचा आपल्या विभूतींत समावेश केलेला आहे. त्याचें कारण श्रीरामचंद्रप्रभूंचें अवतार-कार्य नरमांस भक्षक, परस्त्रीयाचे अपहरण करणारा व ऋषी मुनींच्या तपांत व यज्ञांत विघ्नें आणून तें उध्वस्त करणारा

आसुरी वृत्तीचा रावण व त्याचे दुष्ट प्रवृत्तीचे अनुयायी यांचें निर्दालन करून धर्माची होत असलेली ग्लानी व अधर्माचें वाढत असलेलें प्राबल्य नाहींसें करावयाचें व साधूंचे संरक्षण करून धर्म संस्थापना करावयाची असें असल्यामुळें सहाजिकच श्रीरामचंद्रप्रभूंच्या एकबाणी व्रताचा समावेश भगवंतानीं आपल्या विभूतींत केला व आपल्या विभूती सांगतांना श्रीरामचंद्रप्रभूंबद्दल 'रामःशस्त्रभृतामहम्" असा गौरवाचा उल्लेख केला असला पाहिजे असें वाटतें. तुल्य पवित्र व तुल्य श्रेष्ठ असलेल्या श्री रामचंद्र प्रभूंच्या एकपत्नी, एकवचनी व एक बाणी या तीन गुणांपैकीं पहिले दोन वगळून तिसऱ्या एकट्यालाच विभूतिमत्त्वांत दाखल करण्यास वर दिलेल्या अवतार मीमांसेशिवाय संयुक्तिक असें दुसरें कांहीं कारण दिसत नाहीं.

## श्रीसाई व श्रीराम

कै. गोविंदराव दाभोळकर यांनीं लिहिलेल्या साई चरित्रांतील अध्याय नं ४३मध्यें खालील ओव्या आहेतः—" निकट येतां देहावसान। साधुसंत आणि सज्जन। घेती वाचवूनी पोथी पुराण। सावधान परिसती (४१) 'अंतेमतिः सा गतिः।' हें तो प्रसिद्ध सर्व जाणती। भगवत् भक्त स्वयें आचरती। लोकसंग्रह रीती हे। (३४) अवकाश चवदा दिवस राहीला। काळ बाबांचा जवळ आला। जाणोनी बाबांनीं वझे योजिला। वाचावयाला राम विजय ॥ (३५)

वरील ओव्यावरून श्री साईबाबांनी आपल्या महायानाच चवदा दिवस पूर्वीपासूनच श्री रामचंद्र प्रभूंचें नांव आपल्या कानीं पडावें अशी व्यवस्था केली होती हे स्पष्ट दिसतें. श्री साईबाबांना हिंदु धर्म इस्लामधर्म खिस्ती धर्म वगैरे या भूतलावर प्रचलीत असलेल्या अनेक धर्मांबद्दल सारखाच आदर होता. असें असतांनाही अनेक धर्मांत असलेल्या देवदेवतांपैकीं व महनीय विभूतींपैकीं हिंदुधर्मांतील श्री रामचंद्र प्रभूंचेंच नाव आपल्या कानीं अंतःकाळा पडावें अशी जी इच्छा साईबाबांनीं प्रगट केली होती, त्यावरून श्री रामचंद्र प्रभूंबद्दल त्यांना विशेष आदर व आपुलकी वाटत असली पाहिजे हें उघड दिसतें व म्हणूनच साईलीलेकरितां कांहीं लिखाण पाठवावें हें मनांत आलें तेव्हां श्री रामचंद्र प्रभूंबद्दल चार शब्द लिहावे अशी इच्छा झाली व त्यास अनुसरून श्रीसाईबाबांच्या प्रेरणेनेंच 'रामःशस्त्रभृतामहम्' हा श्रीरामचंद्रप्रभूंबद्दलचा लेख वाचकांस सादर करीत आहें.



# साधन नामचि सार

(पूर्वार्ध)

चालू काळांत नाम महात्म्य शब्दांनीं वर्णन करून सांगतां येणार नाहीं, एवढें अपरंपार आहे; परंतु आज काल त्याच्याकडे कोणाचें लक्ष आहे ? तें लागणें मात्र जरूर आहे.

'कलियुगीं साधन नामचि सार-' असें म्हटलें आहे. संसारांत वावरत असतां सुख, समाधान व शांति लाभावी यासाठीं प्रत्येकाची धडपड सतत चालू असते; परंतु धडपड करूनही त्यांचा लाभ मात्र होत नाहीं. कसा होईल ? सध्याच्या काळांत शाश्वत सुख मिळविण्याचा सर्वांत सोपा उपाय म्हणजे 'रामनाम' हाच होय. रामनाम याचा अर्थ आपल्या इष्ट देवतेचें ध्यान व जप करणें. मग तुम्हीं राम नाम घ्या, कृष्णाचें नांव घ्या किंवा शंकराचें नांव घ्या. दानधर्म, जपजाप्य व यज्ञयाग यासारखे अनेक मार्ग सांगितले आहेत; परंतु नामासारखें नाम-जपासारखें सुलभ साधन दुसरें कोणतेंही नाहीं; त्यासाठीं कांहीं खर्चावें लागत नाहीं. मनाची एकाग्रता मात्र साधतां आली पाहिजे. अंतःकरण श्रद्धायुक्त बनलें पाहिजे.

सर्व साधुसंतांनीं आजवर नाम-महात्म्य गायिलें आहे. नामाचा महिमा परोपरीनें सांगितला आहे. ते स्वतः नामाच्या सहाय्यानें तरून गेले, थोर पदाला पोहोंचले व चिरंजीव झाले. त्यांनीं स्वानुभवानें नामाचें महात्म्य गायिलें असें असतांही या सुलभ उपायाची कांस धरणारीं फार थोडीं माणसें आपणांस दिसतात, याचें कारण काय बरें असावें !

## सर्वांना गोडी कां वाटत नाहीं ?

देवाचें नांव घ्यावें असें सांगणें फार सुलभ असलें व दिसायला हें साधन अत्यंत साधें असलें तरी तें वाटतें तेवढें सुलभ नाहीं. पूर्वपुण्य, पूर्वसंस्कार ज्याच्या गांठीशीं असतील त्यालाच देवाचें नांव घेण्याची बुद्धि होईल व त्यांत गोडी वाटेल. सर्वांनाच ती गोडी वाटणार नाहीं. शास्त्रें-पुराणें वाचणें व शास्त्रार्थ किंवा वादविवाद करणें सुलभ आहे; परंतु एकाग्रतेनें आवडीनें रामनाम घेणें सुलभ नाहीं.

पुष्कळांस वाटत असतें कीं, देवाचें नांव घेण्यांत एवढें काय मोठेंसें आहे ?

फार सोपी गोष्ट. आणि म्हणूनच ती कोणाच्या त्रिजगतींत फारशी नसते. जप, तप दानादि मार्गांनें जाणाऱ्यासही जें साध्य होत नाहीं, तें हरिनाम किंवा रामनाम घेतल्यानें कसें साध्य होणार? अलिकडे तर इंग्रजी शिक्षणाचा लाभ होऊन 'ज्ञान संपन्न' झालेल्यांना नामजपाचें कांहींच महत्त्व वाटत नाहीं. एवढेंच नव्हे, तर त्यांत त्यांना कमीपणा वाटतो.

होय, मनुष्यमात्रावर संकटें कोसळलीं विपत्तीचा काळ वांट्यास आला व सर्व उपाय संपले म्हणजे मग त्याला देवाचें नांव घ्यावें, देवाला आळवावें असें वाटूं लागतें. सगळ्यांचा आधार तुटला म्हणजे देवाच्या आसऱ्याला जावें, असें वाटूं लागतें. माणसावर संकटपरंपरा कोसळणार, आपत्ति वांट्याला येणार तेव्हां माणूस देवाला आठवणार! असें हें पणित आहे.

## कुंती मातेचें मागणें

कुंती मातेनें भगवान् श्रीकृष्णाकडे विपत्तीचें वरदान मागितलें. ती म्हणते, 'भगवंता! विपत्तींत तुझी आठवण होते; तेव्हां माझ्यावर वारंवार संकटें येऊं देत; मला विपत्तींत जीवन कंठू दे!"

परंतु मौज कशी आहे पहा! भगवन्नाम दीन, दुःखी लोकांचें आश्रयस्थान या समजुतीनें जे स्वतःला सुसंपन्न, मोठे व ज्ञानी समजतात, ते रामनामाकडे पाठ फिरवितात. आम्हांला काय जरुरी रामनामाची! ठीक चाललें आहे कीं आमचें! परंतु हा भ्रम आहे, ही खोटी समजूत आहे.

दुसरा एक वर्ग आहे. त्यांना वाटतें, रामनाम घेतलें कीं पापांचा परिहार होतो. तेव्हां वाटेल तीं पापें करायला आपणास हरकत नाहीं. रामनाम घ्यावें आणि पापांचे डोंगर रचीत जावें. रामनामाबरोबर ते आपोआप जमीनदोस्त होतील!

## किती वेडगळ समजूत

किती वेडगळ व मूर्खपणाची समजूत आहे ही! होय; तुमच्या हातून कितीही पापें घडूं द्यात; त्यावर रामबाण उपाय म्हणजे पश्चात्तापपूर्वक रामनाम घेणें. परंतु जो मनुष्य जाणूनबुजून पापकर्म करतो व रामनामाच्या सहाय्यानें त्यांतून मी मुक्त होईन असें मानतो त्याच्या पापाचा लवलेशही कमी होत नाहीं. असें पहा कीं, रोगपरिहार करण्यासाठीं औषधयोजना करावयाची असते; परंतु औषधानें रोग बरे होतात म्हणून वाटेल तसें वागून व वाटेल तें व मन मानेल तसें खाऊन तुम्ही जाणूनबुजून रोगांना आमंत्रण केलें तर तेथें औषधयोजना काय करणार? त्याला मरणाचाच मार्ग मोकळा झालेला असतो.

## एका लोभी व्यापाऱ्याची गोष्ट

एक बडे व्यापारी हातांत जपमाळ घेऊन रामनामाचा जप करीत बसले होते. तोंडानें राम, राम म्हणत होते; परतु लक्ष होतें अनेक गोष्टींवर व व्यापारधंद्यावर. त्याचा मुलगाही जवळच बसून देवपूजा करीत होता. हातांतील माळ

फिरवीत असतां शेटजी मुलास उद्देशून म्हणत होते—'अरे ! तुला समजत नाहीं. गिऱ्हाइकांशीं वागतांना सच्चेपणा बाळगून नाहीं चालत बाबा ! राम, राम, राम ! लबाडीशिवाय व मापांत लबाडी केल्याशिवाय का दोन पैसे मिळणार आहेत ! राम, राम, राम ! मी आज आहें उद्यां नाहीं ! राम, राम, राम. व्यापारांतील हें कसब शिकून ठेव ! तरच निभाव लागेल ! राम, राम, राम !'

याला काय म्हणायचें ? हें एक नमुनेदार उदाहरण सांगितलें; परंतु सर्वत्र हाच मासला, कमीअधिक प्रमाणांत दिसून येतो. घरोंदारीं पहा किंवा शेजारी—पाजारीं पहा ! घरोघरीं मातीच्या चुली. रामनाम घेतलें म्हणजे वाटेल तीं पापें करायला आपण मोकळे झालों, असें कोणीही मानूं नये.

## सकाम व निष्काम भक्ति

रामनाम घेणारीं असंख्य माणसें आपण पहातों; परंतु त्या सर्वांचें कल्याण कुठें झालें आहे ? तीं सर्व सुखी कुठें आहेत ! खरें आहे. त्याचें कारण तीं रामनाम घेतात, परंतु त्यावर त्यांची श्रद्धा नसते. रामनाम आवडीनें व श्रद्धेनें घेतलें पाहिजे.

मनांत कोणती ना कोणती कामना बाळगून आपण रामनाम जपतों. त्यामुळें


# लहान मुलाच्या आंकडीवर

### जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स
६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १

: स्टॉकिस्ट :
कांचनलाल चाडालाल क.,
दवाबझार, मुंबई २

# अर्नाळकर ब्रदर्स

### चष्म्यांचे व्यापारी

आमच्या येथें डोळयांची मोफत तपासणी करून शास्त्रोक्त चष्मे वेळेवर तयार करून देण्यांत येतील. सर्व प्रकारच्या फ्रेम्स् व कांचा मिळतील. एकदां आमच्या दुकानीं आल्यानंतर तुम्हीं आमचे कायमचे ग्राहक बनाल.

: मालक :
बाबूराव अर्नाळकर
२५५ गिरगांव रोड,
सरकारी तबेल्यासमोर, मुंबई ४

वि. सू:—श्रीसाईभक्तांसाठीं खास सवलतीचे दर

काय होतें ? नळींत पाणी ओतलें असतां दुसऱ्या वाटेनें तें गळून जातें. तसाच प्रकार घडतो. निष्कामवृत्तीनें नामजप केला म्हणजे त्याचें फळ मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं, परंतु मुळींच कांहीं न करण्यापेक्षां सकाम भक्ति चांगली. कारण एकदां रामनामाची भक्ति लागली म्हणजे त्या सकाम भक्तीतूनच निष्काम–भक्ति जन्माला येईल.

रामनाम अनेकांकडून घेतलें जातें; परंतु सर्वांनाच त्याचें महत्त्व समजलेलें नसतें. त्याचें मोल जाणणारा एखादा दुसराच. हिरा आणि कांच किंवा गारगोटी! त्यांचें मोल जो अस्सल परिक्षांवत जवाहिऱ्या आहे, तोच करील. इतरांना हिरा आणि कांचेचा खडा सारखाच !

## रामनामाचें मोल

कोणी एक श्रद्धावान् भक्त एका साधूच्या दर्शनास नित्यनेमानें जात असे. बऱ्याच दिवसांनंतर त्याची भावना जाणून साधूनें त्याला जवळ बोलाविलें व म्हणाला, "तूं सन्मार्गानें वागणारा, पापपुण्याचा विचार करणारा व श्रद्धाळू आहेस. तुला गुरुमंत्र देण्याची इच्छा मला झालेली आहे. मी तुला एक सोपा मंत्र सांगतों. पहा बरें! तो सोपा तसाच महत्वाचाही आहे. सांगायचा मात्र नाहीं कोणाला!" याप्रमाणें प्रस्तावना करून त्या साधूनें त्या भक्ताच्या कानांत हळूच 'राम' हा मंत्र सांगून त्याचा नित्य जप करण्यास सांगितलें व त्याप्रमाणें तो भक्त श्रद्धायुक्त अंतःकरणानें रामनामाचा जप करूं लागला. एकदां तीर्थयात्रेस गेला असतां गोदावरींत स्नान करून परत येत असतां शेंकडो लोक स्नान करून परत चालले असतां मारे जोरजोरानें रामराम पुकारीत जात असलेले त्यानें पाहिले. या पूर्वीही त्यानें रामराम म्हणतांना अनेकांस पाहिलें होतें; परंतु त्यांच्याकडे त्याचें लक्ष नसे. आज त्याचें लक्ष गेलें. मनांत आलें कीं गुरुजींनें मला गुप्त व कोणाला सांगूं नको म्हणून रामनामाचा मंत्र सांगितला; परंतु इकडे पहावें तों काय, साऱ्या लोकांच्या तोंडीं तो मंत्र आहे. त्याच्या मनांत संशय उत्पन्न झाला. घरीं आल्यानंतर प्रथम गुरुजींकडे जाऊन त्यानें संशय निरसन करून घेण्याचें ठरविलें. आणि त्याप्रमाणें गुरुगृहीं जाऊन तो म्हणाला, 'महाराज ! माझ्या मनांत संशय उत्पन्न झालेला आहे. गुप्त म्हणून मला आपण जो रामनामाचा मंत्र दिला तो सर्वांना माहीत आहे.'

## मोल करण्यासाठीं सारा बाजार हिंडला

गुरुजी त्याच्या बोलण्याचा मतलब समजले. ते म्हणाले, "तुझ्या प्रश्नाचें उत्तर व संशयनिरसन मी करीन मागाहून; प्रथम माझें एक जरुरीचें काम कर पाहूं" असें म्हणून गुरुजींनीं आपल्या झोळींतून एक कांचेप्रमाणें चकाकणारा खडा काढला व तो त्याच्या हातावर ठेवून सांगितलें कीं, 'जरा बाजारांत जाऊन या खड्याची किंमत काय होते, त्याचा तपास

करून ये. तो खडा विकायचा नाहीं. त्याची बरोबर किंमत काय होते एवढेंच मला पहायचें आहे.

त्या भविक भक्तानें गुरूची आज्ञा प्रमाण मानिली व तो बाजारांत गेला. प्रथम त्याला भेटली एक भाजीवाली! तिच्या हातीं खडा देतांच त्याची चमक पाहून हा आपल्या मुलांबाळांना खेळण्यासाठीं ठीक आहे, या समजुतीनें ती म्हणाली, "याचे दोन शेर बटाटे मी देतें!" हें लक्षण कांहीं ठीक नाहीं असें वाटून तो भक्त पुढें सटकला व एका सुवर्णकाराकडे गेला व त्याच्या हातीं खडा देऊन त्याची किंमत काय होईल! असा त्याला प्रश्न करतांच तो म्हणाला, "याचे मी शंभर रुपये देतों. आहे देण्याची तयारी!" भक्ताला वाटलें आपणास गुरुजीनें बरोबर किंमत करून यायला सांगितलें आहे. दागदागिने विकणाऱ्या एका पेढीवाल्यास तो खडा दाखविता त्यानें त्याची किंमत एक हजार रुपये केली.

## संशय दुणावला

भक्ताचें समाधान झालें नाहीं. किंमतीबद्दल संशय दुणावला. तेथून तो एका नामवंत जवाहिऱ्याकडे गेला. खडा पहातांच त्यानें त्याची किंमत एक लाख रुपये केली व आपली विकत घेण्याची तयारी दर्शविली.

परंतु भक्ताला तो खडा विकायचा नव्हता. तो तसाच धांवत पळत आपल्या गुरुजींकडे आला आणि त्याला घडलेली सारी हकीकत सांगितली, व म्हणाला, "महाराज! ज्या शेवटच्या जवाहिऱ्याकडे मी गेलों त्यानें हा खडा अमूल्य आहे; याची किंमतच होऊं शकत नाहीं, असें सांगितलें. तरीही एक लक्ष रुपयांस घेण्याची त्याची तयारी आहे! आतां सांगा, काय करायचें तें!"

## गुरुजीकडून शंका निरसन

गुरुजी म्हणाले, 'सांगतों आतां. तुझ्या पहिल्या प्रश्नाचें मला उत्तर द्यायचें आहे; तुझें शंकानिरसन करायचें आहे. तेवढ्य साठीं हा मार्ग मी स्वीकारला. मी दिलेलें रत्न अमूल्य होतें. परंतु त्याची खरी किंमत सर्वांनाच करतां आली नाहीं. तें रत्न विकण्याची मी परवानगी दिली असती तर २।४ शेर बटाटे घेऊन तूं त्याची विल्हेवाट लावून मोकळा झाला असतास. अमूल्य वस्तु कवडी किंमतीला हातावेगळी झाली असती नाहीं का? त्याप्रमाणें रामनामही अमूल्य आहे. त्याची खरी किंमत जाणणारा हरीचा लाल एखादा दुसराच. बाकीचे सारे बटाटेवाले! डोक्यांत बटाटे भरलेले! त्यांना कसली आली आहे किंमत! रामनामाचा बोध करणारे पुष्कळ आहेत. परंतु त्याची अस्सल किंमत जाणणारे फार थोडे! ते कवडीमोलानं, फुकापासरी रामनाम विकीत असतात. तेथें भक्तिभाव किंवा प्रेमभाव नसतो. तसेंच श्रद्धाही नसते. त्याशिवाय त्यांना रामाची भेट कशी होणार व त्यांच्या दुःखाचा परिहार तरी कसा होणार?"

# शास्त्रज्ञांची चंद्रावरील स्वारी

(लेखक—सदशीव केशव नेऊरगांवकर बी. ई.)

भारतीय योग्यांनीं योगसाधना करून सर्व मंडळाचा भेद करण्याची शक्ति प्राप्त करून घतली होती. योगी समुद्रावरून पायीं चालू शकतो; त्याच्या पयाला पाण्याचा थेंब लागत नाहीं स्वर्गातील संगीत तो येथें बसून ऐकू शकतो व मुंगीचें मनोगत ओळखतो; आणि हिमालयाच्या पर्वतावर ध्यान करून जगतांत सुख नांदावें, म्हणून प्रार्थना करीत असतो.

गेल्या सप्टेंबर महिन्यांत रशियानें फार मोठा विक्रम केला. त्यानें रॉकेट सोडलें तें चंद्रावर जाऊन पोचलें व त्या देशाचीं निशाणें चद्रावर फडकलीं. जगतांत सर्वत्र रशियाचे अभिनदन झालें. रशियाचे जे मित्र नव्हते त्यांनाही हें यश मान्य करावें लागलें. तसें पाहिलें तर पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाचा केवढा जोर असतो! कितीही उंच फेकलेली वस्तु परत त्या आकर्षणामुळें पृथ्वीकडे जोरानें येते; पण या गुरुत्वाकर्षणावर मात करून, रशियन रॉकेट या मंडळाचा भेद करू शकलें. या उज्ज्वल यश मूळें यापुढें मंगळ, शुक्र या ग्रहावरही लवकरच रशिया रॉकेट साडाल अशी चिन्हें दिसू लागलीं आहेत. एक अवघड उदाहरण सुटलें म्हणजे त्याच्या अनुरोधानें पुढील उदाहरणें सुटतात; त्यांतलेंच हा संशोधनाचा प्रकार आहे. ही सांखळी १०।१५ वर्षांत झपाट्यानें वाढेल, यांत संशयच राहिला नाहीं.

## भारताचा मागासलेपणा

आपलें हें युग 'रॉकेट युग' आहे; ॲटम बॉम्बचें युग आहे; हैड्रोजन बॉम्बचें युग आहे. आपला भारत या दृष्टीनें अगदीं मागें आहे. बिगारी यत्तेंतच आहे म्हणा ना! १५० वर्षें तो पारतंत्र्यांत होता. गेल्या १२ वर्षांत त्यानें आपल्या पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालीं आश्चर्यकारक प्रगती केली आहे. रशियाची स्थिती ४० वर्षांपूर्वी मागासलेली होती. परंतु पहिल्या महायुद्धानंतर त्यानें प्रचंड व दीर्घ उद्योग करून आजचें स्थान प्राप्त करून घेतलें आहे. कोणी सांगावें पंचवीस वर्षांनंतर आपला भारत असाच जगाच्या नकाशावर उग्र तेजानें तळपेल. प्रत्येक भारतीयाची इच्छा त्याप्रमाणें असणारच. जगतांत आश्चर्यकारक शोध प्रतिवर्षी लागत असतांना आपण मागासलेले राहणें केव्हांही इष्ट नाहीं. ज्याला मान उंच करून चालावेंसें वाटतें, त्याला तर

ही बोचणी असह्य वाटते. म्हणून तर पंचवार्षिक योजनांचा एवढा खटाटोप व देशाच्या दाही दिशांना प्रचंड प्रयोग शाळांचा व्याप सध्या आपल्या सरकारनें आरंभलेला आहे.

## माकडाच्या हातीं कोलीत

सध्याचें हे विज्ञानाचें, अणुचें युग आहे हें जरी खरें असलें तरी त्यांत एक मोठा धोका आहे. अण्वास्त्रें ज्या मानवाच्या हातांत शास्त्रज्ञांनीं दिली आहेत त्यांची पातळी काय आहे, याचाही प्रामुख्यानें व प्रथमतः विचार केला पाहिजे. अमेरिकेचा भूतपूर्व प्रेसिडंट वॉशिंग्टन लहान असतांना त्याला त्याच्या बापानें एक कुऱ्हाड बक्षीस म्हणून दिली व वॉशिंग्टन ती आनंदानें हातांत घेऊन बाहेर पडला; बागेतील समोर दिसतील त्या झाडावर कुऱ्हाडीचे घाव – कुऱ्हाड कशा चालते – हें पाहण्यांसाठीं तो घालूं लागला. त्यानें आपल्या बागेची दुर्दशा करून सोडली. त्याच्या बापानें हें जेव्हां पाहिलें तेव्हां त्याला आपल्या मुलाचा राग आला; तसाच त्याला स्वतःचाहि राग आला. त्याला कळून चुकलें कीं आपण या अ न भि ज्ञा च्या पोराच्या हातांत कुऱ्हाडीचें शस्त्र देऊन काय मूर्खपणा केला! मला वाटतें, अणूचे नवीन शोध लावलेल्या जगतांतील शास्त्रज्ञांच्या मनांत हेच विचार सांप्रत घोळत आहेत.

## महत्त्वाचा संदेश

पंधरा वर्षांपूर्वी न्यूयॉर्कमध्यें एका उंच ७०/८० मजली असणाऱ्या इमारतीचा पाया समारंभ होता. त्यावेळीं पायामध्यें स्मृतिदाखल म्हणून जगतांतील महत्त्वाचें संदेश ठेवण्यांत आले होते. त्यामध्यें आइन्स्टाईन या सुप्रसिद्ध शास्त्रज्ञाचा एक संदेश होता. त्याचा मतितार्थ थोडक्यांत असा होता; 'सांप्रतचा मानव विज्ञानाच्या युगांत फार झपाट्यानें पुढें जात आहे. माझ्या लहानपणीं ही स्थिति नव्हती. सध्यां जगतांत विमानें या देशांतून त्या देशांत झपाट्यानें जात आहेत. शास्त्रज्ञ प्रत्यहीं नवीन शोध लागून मानवाच्या ज्ञानांत भर घालीत आहेत. मोठी समाधानाची गोष्ट आहे. आम्ही शास्त्रज्ञांनीं या शोधांसाठीं रात्रीचा दिवस केला तो याच कारणांसाठीं कीं जगतांत सुख आनंद नांदावा. परंतु सांप्रत मनुष्य मत्सर, हेवा दावा, इर्षा या दुर्गुणांतच राहिलेला दिसून येत आहे व त्यामुळें मला नेहमीं भय वाटतें कीं, या शोधांचा परिणाम काय होणार? मला आशा आहे कीं हा माझा संदेश पुढील शतकांतील मंडळी वाचतील तेव्हां त्यांना ही उणीव दूर झालेली दिसेल; व मनुष्य हा सुसंस्कृत वातावरणांत वाढलेला राहील.'

गेल्या महायुद्धांत हिरोशिमा व नागासिकी या दोन जपानमधील शहरांवर पाश्चिमात्य राष्ट्रांनीं अणुबॉम्ब टाकून दुर्दैवानें आईनस्टाईन यांची भीति खरी करून दाखविली. एका रात्रींत हजारो निरपराधीं बायकामुलें मृत्युमुखीं पडलीं. हजारो जायबंदी झाले. हजारों कायमचे निकामी बनले, व पृथ्वीवरील

वातावरणांत जे विषारी वायु पसरले त्याचा परिणाम ५० वर्षांपर्यंत पुढें भोगावा लागेल असा शास्त्रज्ञांनीं इशारा देऊन ठेवला आहे.

## पुराणांतील कंस, रावण संपले नाहींत !

हजारों लोक मेले, जखमी झाले, हवेचें वातावरण दूषित झालें याचें भयानक चित्र तर आहेच; पण त्यापेक्षां मानवापुढें फार मोठा भीतिदायक प्रश्न हा अणुबॉम्ब टाकून पाश्चिमात्य राष्ट्रांनीं उत्पन्न केला आहे, व तो असा कीं, विसाव्या शतकांतील मानव निरनिराळ्या सुधारणा व शोध लागूनही पूर्वींसारखाच रानटी व राक्षसच राहिला आहे काय ? त्याची पूर्वींची वल्कलें गेला त्या जागीं उंची सूट पँट आली. दाढी मिशा गेल्या त्याऐवजीं गुळगुळीत दाढी केलेला व सुवासिक तेल डोक्यांस लावलेला चेहरा आला, रांगडी भाषा बोलणारा अशिक्षित मनुष्य गेला, त्याऐवजीं गोड बोलून केसानें गळा कापणारा शिकलेला मनुष्य आला ! सारांश पुराणांतील रावण संपले नाहींत. त्यांचे अवतार सभ्य पोशाख घालून सांप्रत वावरत आहेत. त्यामुळें तर मोठें नुकसान होत आहे. पूर्वी राक्षस दिसला कीं, मनुष्य त्याचें पारिपत्य करण्यासाठीं सज्ज राहात असे. आतां सभ्य पोशाखांत राक्षस वावरत आहेत, त्यामुळें मनुष्याची फसवणूक होत आहे. डेक्कनक्वीनमध्यें फर्स्ट क्लासचें तिकिट काढून चोऱ्या करणारे अपटुडेट चोर दिसू लागले आहेत. पूर्वींचे ते तंट्या रामोशी गेले ! शास्त्रज्ञाच्या शोधाचें या चोरांनीं, दरोडेखोरांनीं वाटोळें केलें आहे. सिनेमाचा शोध ज्यानें लावला त्याला काय कल्पना कीं याचा उपयोग मनुष्य दुसऱ्याच्या घरीं चोऱ्या करण्याची व दुसऱ्याची बायको पळविण्याची विद्या संपादन करण्यासाठीं करील ?

मनुष्य आज ना उद्या चंद्रावर जाईल यांत आतां संशय उरला नाहीं. पण

श्री साईनाथ प्रसन्न

स्थापना ] खास लोकाश्रयाखालील [ १९२५

हरि महादेव वैद्य (रत्नागिरीकर)

सोनें, चांदी, मोती व जवाहिर

यांची लोकप्रिय पेढी


न. चिं. केळकर रोड, दादर, मुंबई

टे. नं. ६०३५१ GRAM : JEWELKING

चंद्रावर तो गेला तर तेथील वातावरण तो आपल्या दुर्गुणानें बिघडवून टाकील अशी साधारण भीति वाटते. स्वर्गाचा नरक करण्याची त्याची वृत्ति आहे; म्हणून हे शोध फार घातकी आहेत. एक हड्रोजन बॉम्बमध्यें सर्व जगाचा संहार करण्याचें सामर्थ्य आहे असें प्रसिद्ध झालें आहे. म्हणून जर महायुद्ध — तें कधींही न घडो अशी आमची प्रार्थना आहे — पुढील काळांत झालें तर महाभारतीय युद्धाप्रमाणें १८ दिवसही टिकणार नाहीं. कांहीं तासांतच त्याचा निकाल लागेल. एका शहरांत बसुन पांच हजार मैलांवरील शहरें उध्वस्त करणारी रॉकेटची शस्त्रें आज उपलब्ध आहेत.

## भारताचें वैशिष्ट्य

भारतीय योग्यांनीं योग साधना करून सर्व मंडळाचा भेद करण्याची शक्ति प्राप्त करून घेतली होती. योगी समुद्रावरून पायीं चालूं शकतो, त्याच्या पायाला पाण्याचा थेंब लागत नाहीं, स्वर्गांतील संगीत येथें बसून ऐकूं शकतो; व मुंगीचे मनोगत ओळखतो. ही सर्व अणुशक्ति तो आपल्या आत्मबळानें प्राप्त करूं शकतो व हिमालय पर्वतावर ध्यान करून जगतांत सुख नांदावें—'सर्वे सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयः सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात्' अशी प्रार्थना करीत असतो. जगताची स्थिति चालावयाची असेल तर असे ईश्वरनिष्ठ योगी निर्माण झाले पाहिजेत. अणुबॉम्ब निर्माण करणारांकडून जगताचा संहार होण्याची भीति आहे. भूतें उठवणें सोपें आहे; पण तीं आंवरणें फार अवघड आहे. भस्मासुरानें प्रत्यक्ष शंकराच्या डोक्यावरच हात ठेवला तशी स्थिति या पाश्चिमात्य राष्ट्रांची झालेली आहे. यांतून सोडविण्यास समर्थ असा कोणता देश असेल तर तो भारतच आहे. भारत ही पुण्यभूमि आहे. भारतानं तो वारसा पुढें चालविला पाहिजे. परंतु विज्ञान युगांत त्याचें प्रारब्ध सर्व जगांशीं निगडित झालेलें असल्यामुळें त्यालाही या विज्ञान जगांत मागें राहतां येत नाहीं. एक गोष्ट मात्र निश्चित् आहे कीं, या ज्ञानाचा उपयोग भारत जगाच्या कल्याणाकरितां व दुःखिताची पीडा हरण करण्याकरितांच करील, व भारताचें हेंच वैशिष्ट्य आहे. पाश्चिमात्यांच्या विज्ञानाच्या शोधांना पौर्वात्य अध्यात्मिक तेजाचें बळ मिळालें तर सोन्याला सुगंध प्राप्त होईल. आपण प्रार्थना करूं या कीं तसें घडावें.



# ‘ सुख पहातां जवापाडें– ’

**सुख आणि दुःख मानण्यावर असलें तरी खरा सुखी कोण, शाश्वत सुख कशांत आहे, हें आपण पाहिलें पाहिजे. सुख पहातां जवापाडें। दुःख पर्वताएवढें ॥ असेंच आपणांस अनुभवांतीं आढळून येईल. मग शाश्वत सुखाच्या लोभासाठीं आपण कोणत्या मार्गानें जावें ?**

आम्हीं रात्रंदिवस जीवतोड मेहनत घेऊन सुखाच्या प्राप्तीसाठीं धडपडत असतों. नाना प्रकारच्या उलाढाली करीत असतों. हें सर्व कशासाठीं चाललेलें असतें ? केवळ सुख मिळावें म्हणून. मी सुखी व्हावें, माझ्या बायकोला व मुलांबाळांना सुख प्राप्त व्हावें म्हणून आपली अहोरात्र धडपड चालू असते. दुःख आमच्यापासून दूर पळावें, त्याचा केव्हांही स्पर्श होऊं नये असें आम्हांला मनापासून वाटतें; परंतु आपण इच्छिल्याप्रमाणें घडत असतें कां ? सुख पाहिजे म्हटल्यानें सुख मिळत नाहीं; त्याचप्रमाणें दुःख नको म्हटल्यानें दुःख आपल्यापासून पळून जात नाहीं. सुखाची वाट पहातां पहातां वाट्याला दुःख येत असतें.

मनांत नानाप्रकारच्या इच्छा आकांक्षांची गर्दी उसळते. हें पाहिजे तें पाहिजे असें वाटूं लागतें. त्यापायी बेचैन होऊन त्यांच्या पूर्ततेसाठीं आपली धावपळ सुरू होते. परंतु त्या धडपडीचें फळ मिळतें का ? आपल्या कितीतरी इच्छा आकांक्षा मनांतल्यामनांत जिरून जातात.

या जगांत सुख व समाधान एकाच गोष्टींत आहे. मी कोण व या जगांत मी कशासाठीं आलों, हें आत्मज्ञान प्राप्त करून घेणें यांतच सुखसर्वस्व आहे. स्वतःला ओळखणें, स्वस्वरूपाची जाणीव करून घेणें, यांतच दुःखाचा नायनाट आहे.

सुखदुःख हे काय प्रकार आहेत हें जाणून घेण्याचा आपण कधीं प्रयत्न केला आहे काय ? आपण नेहमीं म्हणत असतों कीं, सुख काय किंवा दुःख काय हे सारे प्रारब्धभोग आहेत. ते भोगल्याशिवाय सुटका नाहीं. आपल्या हातून पुण्य घडलें असेल तर सुख मिळेल व पाप घडलें असेल तर दुःख भोगावें लागेल. परंतु थोडासा विचार करून पाहिलें तर असें आढळून येईल कीं, सुखदुःख हें

मानण्यावर आहे; आपल्या मनाच्या प्रवृत्तीवर व समजुतीवर अवलंबून आहे. मनानें मानलें तर सुख व मनानें मानलें तर दुःख !

● ● ●

मुलाच्या मृत्युनें कोणता पिता दुःखी होणार नाहीं ? परंतु नरसी भगत या संताचा एकुलता एक पुत्र आकस्मिकपणें निधन पावला असतां तो दुःखी कधी झाला नाहीं; उलटपक्षी ही भगवंताची लीला, ही त्या प्रभुरायाची इच्छा, तिच्यापुढें मान तुकविणें हेंच आपलें कर्तव्य मानून तो तंबुरी घेऊन हरिभजनांच्या रंगांत नाचू लागला ! जें नरसी भगतला शक्य झालें तें तुम्हां आम्हांला कां शक्य होऊं नये ? आणि नरसी भगत कशाला ? आपल्या सभोंवार निरखून पाहिलें तर दुःखावर विजय मिळविलेलीं व मनावर ताबा संपादन केलेलीं थोर माणसें आढळून येत नाहींत का ? यांतील तात्पर्यार्थ असा आहे कीं, जो विवेकी आहे तो सुखदुःखावर विजय मिळवूं शकतो; कितीहि विपन्न व प्रतिकूल परिस्थिती वाट्याला आली तरी विवेकी माणूस प्रसन्नता राखूं शकतो. त्याच्या मनांत चलबिचल होत नाहीं. अशीं माणसें फार थोडी असतात; परंतु तीं खरोखर पूजनीय होत. दुःख कोसळलें तरी त्यांना तें दुःख वाटत नाहीं. त्यांना तें सुखच वाटतें; कारण 'सुख दुःखे समेकृत्वा, अशा पदाला ते पोहोंचलेले असतात.

● ● ●

जे भाग्यवंत असतात, त्यांनीं हुरळून जाण्याचें कांहींच कारण नाहीं. भाग्यश्री, लक्ष्मी, ही केव्हां जाईल त्याचा नेम नसतो. वाट्याला आलेली परिस्थिती अनुकूल असो वा प्रतिकूल असो. मन

*A Pocket-Book !* HAVE YOU READ *For Everyone !*

# LIGHT-POWER-WISDOM

*BY*

*SRI SWAMI SIVANANDA*

(Here is a unique work on practical spiritual life, which should be a constant companion to everyone ! On every page are given tabloid instructions on the diverse aspects of divine life, the simple methodology of Sadhana, the inspiring clarion call to rise above sorrow and limitation, the striking solutions to the problems of mundane existence, the quintessence of the spiritual experiences of a world-renowned saint !

*Order for your copy now ! Over 50,000 copies printed !*
*Revised and enlarged 14th edition. Re. 1 ( postage extra )*

SIVANANDA PUBLICATION LEAGUE,
P. O. SIVANANDANAGAR, RISHIKESH, U. P.

*Space donated by* : **T. A. S. Rao,** 1/49 ?huta Niwas,
Vincent Road, Matunga, Bombay 19,
The above Copy is Available here Contact by Post.

शांत व समतोल राखणें, भय किंवा चिंता यांस आसरा न देणें ही एक महान कला आहे. ईशकृपा ज्यांच्या वाट्यास आली त्यांनाच ती साध्य होत असते. जें व्हायचें तें होणारच; व जें होणार नाहीं, घडणार नाहीं तें तुम्हीं कितीही घडपड केली तरी होणार नाहीं.

'फिकीर न करावी यत्किंचित।
सदा असावें आनंद भरित।
चिंता न करावी आमरणान्त।
उपदेश नित्य बाबांचा॥

किती साध्या व हृदयाचा ठाव घेणाऱ्या भाषेंत बाबानीं तुम्हा आम्हांला सुखाचा महामंत्र देऊन ठेविला आहे; परंतु तो कुठें आहे आमच्या खिजगणींत !

● ● ●

प्रत्येक मनुष्यानें आपल्या वाट्यास आलेलें कर्तव्य सचोटीपूर्वक करण्यासाठीं झटावयाचें; त्याचें जें कांहीं फळ मिळावयाचें तें मिळाल्याशिवाय कदापि रहाणार नाहीं. सुखसंपदा, मग ती कोणत्याही स्वरूपांत असो, तिचें आगमन झालें असतां हुरळून जावयाचें नाहीं किंवा तिनें पाठ फिरविली म्हणून दुःखी कधीही व्हायचें नाहीं. या जीवनांत हा योग ज्यानीं साधला ते धन्य होत.

● ● ●

ईश्वर परम दयाळू आहे. तो एकाचा मित्र व दुसऱ्याचा शत्रू नाहीं. त्याला आपपरभाव नाहीं तो जें करतो तें आपल्या सुखासाठींच करतो. आपल्याकडे तो संकटें पाठवितो, आपत्तींना तोंड द्यायला लावतो; हें सारें कशासाठीं ? आम्हीं सुखी व्हावें, त्याला म्हणजेच स्वतःला ओळखावें म्हणून ! पिता आपल्या पुत्राचें अहित कधीं तरी चिंतील का ? परमेश्वर साऱ्या जगाचा पिता आहे. तो आपल्या पुत्रांचें, भक्तांचें अहित कसें करील ? आम्हीं उमजावें, आमचें उत्थान व्हावें, व आम्हीं खालच्या पातळीवरून वर वर जात जावें हीच त्याची इच्छा असते. ती सफल व्हावी म्हणून त्याचे नाना प्रयत्न चाललेले असतात.

● ● ●

तुम्हांला या जगांत सुखी व्हायचें आहे ना ? मग त्याच्यामागें लागूं नका. तो दुःखाचा मार्ग आहे. निरीच्छ होण्याचा प्रयत्न करा. या जगांतील साऱ्या गोष्टी क्षणभंगूर आहेत; तुमचें जीवनच क्षणभंगूर आहे ! तेथें आशा कसली करायची व घडपड कशासाठीं करायची ? या जगांत सेवाभाव हाच शाश्वत आहे. दुसऱ्याची यथाशक्ति सेवा करणें, दुसऱ्याच्या सुखासाठीं झटणें हाच खरा सुखाचा मार्ग आहे. त्यांत जी प्रसन्नता व जो आनंद आहे तो दुसऱ्या कोणत्याही गोष्टींत नाहीं. तुम्हीं त्या शाश्वत सुखाचे व आनंदाचे वाटेकरी व्हा. देवासन्निध जाण्याचा तो एक मार्ग आहे.

'पाहीं भूत मात्रीं जो मज।
तोच माझिया प्रीतिचा समज।

या बाबांच्या वाक्याचें मर्म ज्यानें जाणलें त्यानें जन्मा आलियाचें सार्थक केलें असें समजावें.

———

# रसाळ वाणी ही दैवी संपदा

**वाणीचें व लेखणीचें सामर्थ्य अमोघ आहे. वाणी जोडूं शकते व तोडूंही शकते. साधकानें आपल्या वाणीवर नेहमीं ताबा ठेवला पाहिजे. सुटलेल्या बाणाप्रमाणें एकदां मुखावाटे बाहेर पडलेला शब्द मागें येऊं शकत नाहीं. यासाठीं आपल्या वाणींत गोडवा व रसाळता असावी.**

जन्मदात्या ईश्वरानें मनुष्यमात्राला त्याच्या कल्याणासाठीं ज्या कांहीं देणग्या दिल्या आहेत त्यांत बोलणें, संभाषण करतां येणें, ही एक बहुमोल देणगी आहे. तिचा सदुपयोग किंवा दुरुपयोग करणें हें आपल्या हातीं आहे. आपण शब्दसृष्टीचे परमेश्वर आहोंत. शब्दांचें सामर्थ्य अपरंपार आहे. शब्द तारतो त्याचप्रमाणें मारतोहि. यासाठीं जें बोलायचें तें गोड बोलायचें; शब्दानें कोणाला केव्हांही तोडायचें नाहीं असा रोज निर्धार करून तो अंमलांत आणण्यासाठीं आपण झटलें पाहिजे. त्यामुळें स्वतःला व इतरांनाहीं आनंद व सुख यांचा लाभ होत असतो.

## वाणीचें सामर्थ्य

पथ्यकर व हितकर बोलतां येणें हा एक दैवी गुण आहे. जे देवमार्गात असत त, ज्यांची देवधर्मावर व माणुसकीवर श्रद्धा असते त्यांना या गुणाची जोड लाभायला फारसे प्रयास करावे लागत नाहींत.

मधूर भाषण ही एक अमोघ शक्ति आहे. त्या शक्तिपुढें सर्वांना वाकावेंच लागतें. देव, दानव किंवा मानव कोणीही असो. तो या शक्तीपुढें वाकतोच वाकतो. तुम्हीं कोणत्याही क्षेत्रांत असा, तुमचा व्यवसाय कोणताही असो; तुमच्या जबाबदाऱ्या कोणत्याही प्रकारच्या असोत. तुम्हीं मितभाषी व मधूरभाषी असाल तर त्या त्या क्षेत्रांत व शिरावर घेतलेल्या जबाबदारींत यशस्वी झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

भगवान श्रीकृष्णानींही मनुष्यमात्राच्या कल्याणासाठीं सत्य, प्रिय व हितकर असेल तेंच बोलण्याचा सुखद संदेश देऊन ठेविला आहे.

गोड बोलणें ही का महाकठीण गोष्ट आहे? परंतु आमचा स्वभावच पडला तामसी! मग आमचें व गोड बोलण्याचें सख्य व्हावें कसें? एखाद्या दुकानांत किंवा स्टोअरमध्यें कांहीं तरी खरेदी करण्यासाठीं जा. तेथें विक्रेता गोड

बोलणारा असला तर तुमच्यावर छाप पडल्याशिवाय रहाणार नाहीं; परंतु बहुधा आपणास अनुभव येतो तो मात्र वेगळाच! मालक व नोकर यांनीं आपलें कार्य साधण्याचा राजमार्ग म्हणजे गोड बोलणें हें जाणलें पाहिजे.

साधक, मग त्याला कोणतीही गोष्ट साध्य करायची असो. तो मोक्ष मार्गावरील साधक असो किंवा ऐहिक मार्गावरील साधक असो; त्यानें आपली वाणी गोड, रसाळ व निर्मळ ठेविली पाहिजे.

## वाणी व लेखणी

परंतु गोड बोलणें, गोड वागणें हें उगाच संभवत नाहीं. त्यासाठीं आपलें अंतःकरण गोड व निर्मळ असावें लागतें. आपल्या मनांत नेहमीं सात्वीक शुद्ध व दुसऱ्याच्या कल्याणासंबंधीं विचार वावरत असले पाहिजेत. भोंदूचें, ठगाचें गोड परंतु आपमतलबी बोलणें काय कामाचें?

ईश्वरानें आपणास बोलण्याची कला व लिहिण्याची कला दिली आहे. तिच्या सहाय्यानें दुसऱ्यावर प्रहार करतां येतात व दुसऱ्याच्या अंतःकरणाची वाटेल तशी चिरफाडही करतां येते. परंतु तो मार्ग आपला नव्हे, अंतःकरणें जोडणें, त्याचा मिलाफ घडवून आणणें व मनांतील किल्मीष नाहींसे करून अंतःकरणें फुलविणें हेंच कार्य या जन्मीं आपणास उरकावयाचें आहे. म्हणून तर तुमचा जन्म आहे.

'मनें फुलवावीं।
तुज म्हणुनी जन्मप्राप्ति॥'

कधीं कधीं कर्तव्यपालनाखातर कटु बोलण्याचा प्रसंग उद्भवत असतो. निरुपाय झालेला असतो. परंतु अशावेळींही आपण सौजन्यशीलतेला फाटा न देतां जें कांहीं बोलायचें व जें कांहीं करायचें तें गोड व दुसऱ्याच्या मनाला कमीत कमी लागेल अशा भाषेंत बोललें किंवा लिहिलें पाहिजे.

ज्याची जिव्हा मधुरभाषी असते त्याच्यावर देवदेवता खूष असतात.

BILOGY PRACTICAL (I. Sc.)
From 25th October
F. Y. & INTER
ARTS & SCIENCE
From 9th November
**Pinge's Classes**
Bismillah Bldg., Opp. Dadar W. R.

त्याला इच्छिलेलें देतात व त्याच्या सेवेला नेहमीं हजर असतात.

तुम्ही फार कशाला बोलतां ? थोडेंच बोला; परंतु जें बोलाल तें मधूर व हितकर बोला. शुभ, गोड व मधूर बोलणें हें दैवी संपदेचें एक लक्षण आहे. ही संपदा साधीसुधी नाहीं. ती तुम्हांला व इतरांना सुख आणि समाधान देणारी आहे, हें विसरूं नका.

## वाणीचे घाव बुजत नाहींत

आपण एक गोष्ट नेहमीं लक्षांत ठेवली पाहिजे कीं, शस्त्राच्या सहाय्यानें केलेल्या जखमा औषधोपचारानें किंवा मलम पट्टीनें बुजूं शकतात; परंतु अंतः-करणावर शब्दांचे जे घाव होतात ते बुजूं शकत नाहींत. शब्दांनीं तंटे मांडणें व युद्धेंही घडवून आणिलीं आहेत. कठोर शब्दांनीं शरिराचा भडका होतो. माणूस बेभान होतो व त्या भरांत तो काय करील आणि कोणत्या थराला जाईल हें सांगतां येणें कठीण असतें.

एखाद्याकडून कांहीं चुकभूल होते; एखाद्याकडून आपणांस दगाफटका घडतो; एखादा आपला अपमान करतो; या व यासारख्या प्रसंगीं वाणीवर संयम ठेवणें, तोल सुटूं न देणें व अपकार करणाऱ्यास पश्चात्ताप व्हावा अशा रीतीनें बोलणें व वागणें उभयपक्षीं कल्याणप्रद असतें. हें केवळ वाचून विसरून जाण्यासाठीं नाहीं तर उमजून आचरणांत आणण्यासाठीं आहे.

शेवटीं भगवान श्रीकृष्णानीं गीतेंत सांगितल्याप्रमाणें वाणीचें हें वाङ्मयतप आचरणांत आणण्यासाठीं आपण जीवें-भावें झटलें पाहिजे.

अनुद्वेग करं वाक्य सत्यं
प्रियहितंच यत् ।
स्वाध्यायाभ्यसनं चव
वाङ्मयं तप उच्यते ॥

---



◆◆ निराश होणें म्हणजे नास्तिक होणें. परमेश्वर पाठीराखा आहे. विश्वास ठेवा. मुलाला हिंमत यावी म्हणून आई त्याला इकडे तिकडे जाऊं देते. परंतु ती त्याला पडूं देणार नाहीं. पडूं लागलें तर हळूच येऊन उचलील. ईश्वरही त्याचप्रमाणें तुमच्याकडे पहात आहे. तुमच्या जीवनाच्या पतंगाची दोरी त्याच्या हातांत आहे. पतंगाची दोरी कधीं तो तंग धरतो, कधीं सैल सोडतो; परंतु सूत्र त्याच्या हातीं आहे याची खात्री बाळगा.

—संत विनोबा

# श्री ज्ञानेश्वरीसंबंधीं कांहीं प्रासंगिक विचार

लेखक — वि. पा. सातपुते. मुंबई.

नमो ज्ञानेश्वरा निष्कलंका । जयाची गीतेची वाचितां टीका । ज्ञान होय सात्विका । अतिभाविका ग्रंथार्थिका ॥

श्री एकनाथ महाराज ज्ञानेश्वरी शुद्धीकरण विषयक ओव्या.

ज्या "ज्ञानेशो भगवान् विष्णुः" अशा अवतारी विभूतीनें वयाच्या अवघ्या एकोणीसाव्या वर्षी श्रेष्ठ प्रतीच्या श्रीमद्भगवद्गीतेवरील ओंवीबद्ध टीकेच्या महान ग्रंथाची सुसंपन्न मराठी भाषेंत निर्मिति करून अद्वितीय असें सामाजिक, पारमार्थिक व चिरंतनकाळ टिकणारें कार्य केलें कीं, त्या ग्रंथाची स्थूल रूपरेषाही ग्रंथकर्त्यांच्या समाधिकालाच्या वयाची मर्यादा (१९) उलटी करून पाहिली तरी त्या वयोमर्यादेंतसुद्धां (९१) आकलन होणें कठीण वाटतें. त्या अवतारी विभूतीच्या–श्री ज्ञानेश्वरांच्या चरणीं नम्र वंदन. तद्वतच ज्यांच्या सांन्निध्यांत आल्यामुळें व ज्यांच्या कृपाप्रसादानें, संचितवशात् असलेली ज्ञानेश्वरी विषयक जिज्ञासा व आवड वाढीस लागली त्या, पुण्यपत्तननिवासी ब्रह्मीभूत श्री सद्गुरु भिक्षु कृष्णानंद सरस्वति ( सास्वरे महाराज ) यांना माझे भक्तिभाव पूर्वक प्रणाम.

'ज्ञानेश्वरी' या विषयावर माझ्यासारख्या एका सामान्यानें लिहावयाचें म्हणजे 'क्व सूर्यप्रभवो वंशो क्वचाल्पविषया मतिः' या महाकवि कालिदासाच्या उक्तीप्रमाणेंच आहे. तरीपण "ममत्वेतां वाणीं गुणकथन पुण्येन भवतः । पुनामीत्यर्थेऽस्मिन् पुरमथन बुद्धिर्व्यवसिता ॥ असें पुष्पदंत ऋषींनीं ( श्री शिवमहिम्न स्तोत्र ) म्हटल्याप्रमाणें श्री ज्ञानेश्वरीच्या गुणकथनानें वाणी ( वा लेखणी ) पूनित करून घ्यावी अशा हेतूनें कांहीं विचार यथामति मांडण्याचें योजिलें आहे.

## ज्ञानेश्वरी–सुबोध कीं दुर्बोध

यासंबंधीं लेखकाच्या निकटवर्ती व परिचित वाचकांकडून असें ऐकावयास मिळालें आहे कीं, उत्साहानें वाचनास प्रारंभ करावा तोंच सुरवतीच्याच गणेश स्तवन विषयक ओव्या इतक्या दुर्बोध दिसून येतात कीं अर्थबोध कांहीं होत नाहीं, डोकें दुखूं लागतें व "प्रथम ग्रासे मक्षिकापात" होऊन उत्साह मावळतो व जिज्ञासला व वाचनाला विराम मिळतो. यांतीलच कांहीं प्रयत्नवादी, मूळ ओवी न समजल्यास, सांप्रत साधारणपणें उपलब्ध असलेल्या पुष्कळशा पुस्तकांत, मूळ ओवी व त्या ओवीचा सरळ गद्यार्थ, यांचे साहायानें, ज्ञानेश्वरी विषयांत प्रगति करण्याचा प्रयत्न करणारे दिसून येतात. या वर्गांत मूळ ओवी व गद्यार्थ यांचें

तौलनिक वाचन करणाऱ्यापेक्षां फक्त गद्यार्थाकडेच लक्ष असणारे वाचक बहुसंख्य असण्याची शक्यता आहे. तरी पण ग्रंथ प्रथम प्रसंगींच "दुर्बोध" असा शिक्का मारून हातावेगळा करणाऱ्यांपेक्षां निदान गद्यार्थ पाहाणारा वर्ग "अकरणात मंदकरण श्रेय" या न्यायानें श्रेष्ठ म्हटला पाहिजे.

## ज्ञानेश्वरी दुर्बोध कां वाटते ?

ज्ञानेश्वरीच्या प्रारंभीच्या गणेशस्तवनात्मक पहिल्या सुमारें २० ओव्यांच्या दुर्गमतेमुळें सामान्य जिज्ञासू वाचकाची प्रगति होत नाहीं असें जें वर म्हटलं आहे तें त्या वर्गाच्या दृष्टीनें बरेंच वस्तुस्थिति निदर्शक आहे. ज्ञानेश्वरीच्या एकंदर मराठी भाषेलाच ज्ञानेश्वरमहाराजांनीं अशा मौल्यवान व दैदिप्यमान भाषाभूषणानीं सालंकृत केलें आहे कीं सामान्य वाचकाची दृष्टी त्या दर्शनाबरोबर दिपून जावी. ज्ञानेश्वरीच्या मराठी भाषेच्या या साजाचें सौंदर्य कमी होऊं नये म्हणून ज्ञानेश्वरीच्या विवेचकांना व प्रवचनकारांना त्यांच्या कार्यांत एक विशिष्ट उच्च पातळीच अवलंबावी लागते. त्यापेक्षां खालच्या भूमिकेवर आल्यास श्रोत्यांच्या दृष्टीनें मूळ विषयाचें रसग्रहण यथातथ्य होणार नाहीं व वक्त्याच्या दृष्टीनें मूळ भाषासौष्ठवास कमीपणा आणल्यासारखें होईल. या वरच्या पातळीचें विवेचन सामान्य वाचकास व श्रोत्यास पचनीं पडतां येत नाहीं व याच वर्गाची बहुसंख्या असल्यामुळें ज्ञानेश्वरी सकृद्दर्शनी दुर्बोध वाटते.

## मनन करण्याचा विषय

ज्ञानेश्वरीच्या भाषेच्या उपरिनिर्दिष्ट वैशिष्ट्यामुळें व स्थान माहात्म्यामुळें ज्ञानेश्वरीविषयाचा श्रोताही एका कर्मींत कमी प्रमाणांत अधिकारी असणें आवश्यक आहे हें ओघानेंच येतें. ज्ञानेश्वरी श्रवण हें पुराण श्रवण निःसंशय नव्हे. ज्ञानेश्वरी विषय 'एकदां कानावरून जाऊं' देण्याचा नसून, तो कानावाटे बुद्धींत सांठविण्याचा व मननाचा विषय आहे. याचा प्रत्यय खुद्द ज्ञानेश्वरींतील महाराजांच्या श्रोतृवर्गविषयक अनेक उल्लेखांवरून येण्यासारखा आहे. भाषेची उच्च पातळी व बहुसंख्य अधिकारी श्रोत्यांचा अभाव या दोन टोंकांच्या दोन कारणांनीं ज्ञानेश्वरीसारख्या सर्वांग सुंदर ग्रंथाला इतर लौकिक ग्रंथांच्या मानानें श्रोतृवर्ग कमी आढळून येतो, हीच गोष्ट द्रष्टेपणानें जाणून महाराजांनींही अठराव्या अध्यायांतील 'इदं ते नातपस्काय' या संप्रदायविषयक श्लोकावरील टीकेंत, 'म्हणोनि तपी भक्ती । पाहावें तें सुमद्रापती । परी शास्त्रश्रवणीं अनासक्ति । वाळावेचि ते ॥ या ओवीनें या शास्त्रश्रवणांत अनासक्त असणाऱ्यांचा स्पष्टपणें अधिक्षेप केला आहे. या लेखकाची श्रद्धा व अनुभवही संप्रदायाविना ज्ञानेश्वरींत प्रगति होणें अशक्य आहे अशींच आहेत.

## महाराजांची तळमळ

ज्ञानेश्वरीच्या स्थूल वाचनानेंही असें आढळून येतें कीं, अगदीं सामान्यांतल्या सामान्य व्यक्तींपर्यंत ज्ञानेश्वरीद्वारा भगवद्गीतेच्या मराठी अर्थाचें लेण पोंचावें

अशी महाराजांची तळमळ होती. म्हणून त्यांनी 'तेणें आबाल सुबोधें । वोवियेचेनि प्रबंधें । ब्रह्मरस सुस्वादें । अक्षरें गुंफिलीं (ज्ञा. १८–१७४२) असें उल्लेखित केलें आहे. ज्ञानेश्वरांचा श्रोतृवर्ग सामान्य थरातील होता हें सर्वश्रुत व सर्वमान्य आहे; अतएव बहुजनसमाजाची मातृभाषा म्हणून ज्या मराठीचा महाराजांनीं आपल्या अंगीकृत कार्यासाठीं अवलंब केला व जिच्या माध्यमाच्या श्रोतृवर्गास अडचण पडली नाहीं ती भाषा आजच्या उच्च-वर्णीयांसही दुर्बोध वाटावी याच्या कारणानें विवेचन, त्रुटित कां होईना, अस्थानीं होणार नाहीं.

या दुर्बोधतेचें एक प्रमुख कारण असें असावें कीं, ज्ञानेश्वरांच्या श्रोतृवर्गाची मराठी भाषा व आजची व्यवहारांतील मराठी भाषा यांत महदंतर आहे. अनेक कारणामुळें आजच्या मराठी भाषी व्यक्तीला प्रतिज्ञापूर्वक अल्पकाल कां होईना, अस्खलित मराठी बोलणें जवळ जवळ अशक्य आहे. यास कालमहिमा हेंही एक कारण असूं शकेल. आजची व्यवहारांतील मराठी भाषा अनेक अन्य भाषिक शब्दांनीं युक्त आहे. यांतील कांहीं अपरिहार्यपणें मराठींत संमत झालेले व कांहीं व्यक्तिशः संमत केले गेलेले आहेत. थोड्याशा प्रयत्नानें व सरावानें या दुसऱ्या प्रकारच्या शब्दां-पासून मराठी बोली अलिप्त राखतां आली असती व येईल.

दुसरें एक कारण असें असूं शकेल कीं, आजचा बुद्धिजीवी समाज (पांढर-पेशावर्ग) हा ग्रामीण जीवनास पारखा झाला आहे. आजही असें पाहावयास मिळतें कीं, शहरापासून दूर अशा ठिकाणीं एखादे शिबिर वगैरे असल्यास परस्परांच्या बोलींत बरेचसे बौद्धिक अंतर असल्यामुळें विचारांची देवाण घेवाण तितक्या परिणामकारक रीतीनें होत नाहीं. वस्तुतः ज्ञानेश्वरींतील कठीण वाटणारे अनेक शब्द आजही जसेच्या तसे किंवा थोड्याशा फरकानें प्रचालित आहेत. फक्त हें समजून घेण्यास अभ्यासाची व थोड्या प्रयत्नाची आवश्यकता आहे. यास पोषक अशी अनेक उदाहरणें ज्ञानेश्वरींत दाख-वितां येतील. तेव्हां ज्ञानेश्वरीची मराठी समजण्यास ग्रामीण जनतेशीं जास्त जास्त ससरख व्हावयास पाहिजे.

## ज्वलंत मराठीचा अभिमान

या बाजूचा विचार करण्यापूर्वी ज्ञाने-श्वर कालीन संस्कृत मराठी संबंध लक्षांत घेणें अगत्याचें आहे. जरी ज्ञानेश्वरांनीं आत्मविश्वासाचें व अभिमानाचे बोल ज्ञानेश्वरींत अनेक स्थळीं ग्रथित केलेले आढळतात, तरी ज्या प्रकारचा छळ तुकाराम–एकनाथादि संतांना सनात-न्याकडून वैदिक वाङ्मय मराठींत आणून आबालवृद्धांस उपलब्ध करून देणाऱ्या त्यांच्या तथाकथित अपराधामुळें झाला तशा प्रकारची कांहीं परिस्थिति ज्ञानेश्वरांच्या कालीं होती किंवा कसें याचा ज्ञानेश्वरींत उल्लेख नाहीं. परंतु तर्कानें इतकें जाणून घेतां येतें कीं ज्ञानेश्वरानंतर साडेतीनशें वर्षांनीं अवतीर्ण झालेल्या संतांस जर इतका छळ सोसावा लागला तर खुद्द

ज्ञानेश्वर यांतून सहीसलामत सुटले असतीलच, असें म्हणतां येत नाहीं. हा एक संशोधनाचा विषय आहे व तो अधिकारी व्यक्तींनीं हाताळण्यासारखा आहे इतकें मात्र म्हणतां येईल.

आज उपलब्ध असलेली ज्ञानेश्वरीची गद्य भाषांतरांसहित पुस्तकें जरी बरवर पाहिलीं तरी त्यांत भाषेच्या शुद्धत्वाकडे जवळजवळ दुर्लक्षच झालेलें दिसतें. या पार्श्वभूमीवर, ज्ञानेश्वरांचा भाषाविषयक अभिमान या विषयाचें मूल्यमापनच झालें नाहीं असें म्हणावें लागतें. यांस कारणें अनेक आहेत. मराठीस राजाश्रय नसणें म्हणजेच एक प्रकारचा बेवारशीपणा ज्ञानेश्वरीच्या पुस्तकांचें प्रकाशन वंदेवाइकांच्या हातीं असणें कांहीं अंशी अधिकारी व्यक्तींत सुद्धां डोकावणारी सांप्रदायिक अंधश्रद्धा व ज्ञानेश्वरी विषयांत जरासें खोलवर अवगाहन करण्याच्या बाबतींत संबंधीं लोकांची उदासीनता अशीं सांगतां येतील. आपल्या सरकारनें अधिकृत ज्ञानेश्वरी प्रसिद्ध करण्याच्या इरादानें तज्ञांची एक समिति नेमली आहे. त्या समितीचें संशोधन विषयक कार्य पूर्ण झालें असून पुढील हालचाली सुरूं आहेत असें समजतें. या समितींत प्रा. मामासाहेब दांडेकर या सारख्या संशयातीत अधिकारी व्यक्तीचा समावेश आहे. सुदैवानें नवमहाराष्ट्राच्या निर्मितीच्या तुताऱ्या वाजत आहेत. मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा होण्याचा सुयोग आहे. अशा या दुग्धशर्करायोगांत अवतीर्ण होणारी सरकारी ज्ञानेश्वरी जिज्ञासूंच्या वरील सारख्या अपेक्षा पुऱ्या करील अशी आशा करूं या.

———



पराविया नारी माउली समान । मानिलिया धन काय वेंचे ॥
न करितां परनिंदा परद्रव्य अभिलाष । काय यास तुमचें वेंचे सांगा ॥
बैसालिये ठायीं म्हणतां रामनाम । काय होय श्रम ऐसें सांगा ॥
संतांचे वचनीं मानितां विश्वास । काय यास तुमचें वेंचे सांगा ॥
खरें बोलतां कोण लागती सायास । काय वेंचे यास ऐसें सांगा ॥
तुका म्हणे देव जोडे याजसाठीं । आणीक ते आढे न लगे कांहीं ॥

शिरडी येथील

# पुण्यतिथ्योत्सवाचा सोहळा

आमच्या प्रतिनिधीकडून

शिरडी येथें दर वर्षी होणाऱ्या तीन मुख्य महोत्सवांत विजया दशमीस होणाऱ्या पुण्यतिथ्योत्सवाचें महत्त्व कांहीं आगळेंच असतें. विजयादशमी हा श्री साईबाबांचा समाधि दीन. गेलीं चाळीस वर्षे हा उत्सव भक्तजनांकडून वाढत्या उत्साहानें व मोठ्या भक्तिभावानें साजरा केला जात असतो. श्रीसाईबाबा शिरडी संस्थानची चालक मंडळी भक्तजनांच्या व यात्रेकरूंच्या सुखसोयीसाठीं जितकी म्हणून दक्षता घेतां येईल तेवढी घेण्यांत कसूर करीत नाहीं. प्रतिवर्षी जरुरीप्रमाणें नवनवीन सुधारणा घडवून आणण्यांत येत आहेत.

यंदाचा पुण्यतिथ्योत्सव ता. १० ते १३ आक्टोबर १९५९ पर्यंत चार दिवस मोठ्या थाटामाटांत व यशस्वी रीतीनें पार पडला. भारताच्या निरनिराळ्या भागांतून केवळ हिंदुच नव्हे तर वेगवेगळ्या समाजांतील भक्त मंडळी या उत्सवांत भाग घेण्यासाठीं येतात. गर्दी म्हटली म्हणजे गैरसोय इटकून व्हावयाची. परंतु ती होऊं नये यासाठीं संस्थान समिति आपल्यापरीनें झटत होती. स्टेट ट्रान्सपोर्टतर्फे जादा गाड्या सोडण्यांत याव्या व शिरडीस येणाऱ्या यात्रेकरूंच्या सुखसोईकडे शक्य तेवढें जास्त लक्ष पुरविण्यांत यावें यासाठीं संस्थान समितीनें आगाऊ विनंती केली होती व अधिकारी वर्गाकडून तदनुरूप जरूर तें सहकार्य मिळालेंही; परंतु ता. ९ रोजीं एकाएकीं पाऊस कोसळून नदीनाल्यांस पूर आला व त्यामुळें यात्रेकरूंस थोडाफार त्रास सोसावा लागला व विरसही झाला.

शिरडी येथें वाढत्या प्रमाणांत येणाऱ्या यात्रेकरूंच्या सुखसोयीसाठीं मंडप घालून असंख्य खोल्या पाडण्यात आल्या होत्या. पर्जन्यवृष्टीमुळें त्या साऱ्यांचा उपयोग होऊं शकला नाहीं. पाऊस केव्हां कोसळेल व झोडपून काढील हें सांगतां येणें कठीण असलें तरी यात्रेकरूंच्या सोयीच्या दृष्टीनें जेवढी म्हणून दक्षता बाळगणें जरूर होतें तेवढी बाळगण्यात उत्सव चालकांनीं कसूर केली नाहीं. याठिकाणीं नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे विजयादशमी उजाडण्यापूर्वी अगोदर १।२ दिवस पाऊस कोसळून या उत्सवावर व यात्रेवर पाणी पडणार कीं काय अशी भीति वाटूं लागली होती; परंतु तदनंतर उत्सवाच्या ३।४ दिवसांत वरूण राजानें कृपा केल्यामुळें सर्वत्र आनंदाचें व उत्साहाचें वातावरण पसरून सर्व कार्यक्रम ठरलेल्या वेळीं व यशस्वी रीतीनें पार पडले. भक्तजनांना कोणत्याही प्रकारें त्रास सोसावा लागला नाहीं.

या यात्रेंत बंदोबस्त ठेवण्याची कामगिरी पोलिस, होमगार्डस व स्वयंसेवक यांनीं एकमेकांच्या सहकार्यानें पार पाडली. लाऊड स्पीकरच्याद्वारें मधून मधून सावधगिरीच्या सूचना देण्यांत येत होत्या व प्रत्येकजण सेवाभावानें वागत होता. 'एकमेकां सहाय्य करूं' या नियमाची अंमलबजावणी सुव्यवस्थितपणें होत असलेली सर्वत्र आढळून येत होती. मनुष्य स्वभावाचे पैलू इतरत्र कसेही चमकोत; श्रीसाईबाबांच्या पुण्यस्मरणार्थ जमलेल्या यात्रेत 'मी केवळ माझ्यासाठीं नाहीं, इतरांस शक्य तें सहाय्य करणें हा माझा धर्म आहे,' याच भावनेनें प्रत्येकजण वागत होता आणि तें सहाजिकच होते. अशाप्रकारची परस्पर सहकार्याची, बंधुत्वाची व सेवाभावाची भावना शिरडींत उत्सवानिमित्त एकत्र जमलेल्या स्त्रीपुरुषांत वावरत असली तर त्यांत नवल कसलें ?

समाधी मंदीर रंगीबेरंगी बल्बांनीं सुशोभित करण्यांत आलें होतें; त्याचप्रमाणें मंदिराच्या आसपासच्या सर्व भागांवर उत्सवाची दाट छाया पसरलेली दिसत होती. गुरुपादुका स्थानाची व्यवस्था पहाणारे सेवेकरी श्री. कृष्णराव यांनीं त्या स्थानांतील छोटा बगीचा आपल्या कल्पकतेनें व कलाकुसरीनें नखशिखांत नटवून सोडला होता. कृष्णराव हे गेलीं सुमारें पंधरा वर्षे त्या स्थानांत एक निष्ठावंत सेवेकरी या नात्यानें रहात आहेत. 'त्यांना अमूक कर' म्हणून सांगावें लागत नाहीं. ते एक कल्पक कलावंत आहेत. दर वर्षी केवळ स्वयंस्फूर्तीनें उत्सवप्रसंगीं कांहींना कांहीं सुंदर व प्रेक्षणीय कलाकृतींची निर्मिती करून ते त्या भागाचें सौंदर्य वाढवीत असतात. या वर्षी त्या बगिच्यांत त्यांनीं एक कागदी लाल किल्ला कौशल्यपूर्वक तयार केला होता. दरवाजांत एक महिला पुष्पहार घेऊन उभी आहे व श्रीसाईबाबा तिच्या समोर उभे आहेत हा साधा देखावा; परंतु रंगीबेरंगी बल्बांच्या सहाय्यानें तो प्रेक्षणीय व उठावदार बनविण्यात आला होता. त्या बगिच्याची शोभाही अन्यप्रकारें वाढविण्यांत आली होती. एकंदरीत तें स्थान उत्सवाच्या दिवसांत सर्वांना आकर्षणीय होऊन राहिलें होतें. एका काळीं श्रीसाईबाबांनीं पाणी घालून ज्या बगिच्याची जोपासना केली तोच हा गुरुपादुका मंदिराजवळचा बगिचा अशारीतीनें सुशोभित करण्यांत आला होता.

सकाळीं ५ वाजल्यापासून तों रात्रौ १२ वाजेपर्यंत कोणत्या वेळीं कोठें काय कार्यक्रम होणार हें सर्वांना समजावें या हेतूनें समाधि मंदिरांतील फलकावर रोजच्या रोज कार्यक्रम चिकटविण्यांत येत असे. रोज काकड आरती, श्रींचें मंगल स्नान तसेंच एक दिवस द्वारकामाईंत श्रीसाई नाम संकीर्तन व श्रीसाईसच्चरित्र वाचनाचा कार्यक्रम झाला. संस्थानतर्फे प्रातिनिधीक अभिषेक झाल्यानंतर सामुदायीक अभिषेक सुरू होत असे. त्यानंतर दोन तास श्रींच्या अंगावर भक्तांकडून वेळोवेळीं घालण्यांत येणाऱ्या वस्त्रांची विक्री होत असे व अनेक भक्त तीं वस्त्रें भक्तिभावपूर्वक चढाओढींत भाग घेऊन विकत घेत असत. त्यानंतर माध्यान्ह आरती होऊन सर्वांचें भोजन होत असे.

रात्रौ ९ वाजतां श्रींची पालखीतून मोठ्या थाटांत वाजत गाजत व दिव्याबत्त्यांच्या प्रकाशांत मिरवणूक निघत असे. त्या नयनरम्य व मनाला सात्वीक

आनंद देणाऱ्या देखाव्याचें वर्णन करणें कठीण आहे. एक दिवस श्रींची मिरवणूक रथांतून निघाली होती. हे ३।४ दिसव परळ येथील बँड पथक सेवेला हजर होतें. मिरवणूक प्रसंगीं मधून मधून दारूकाम सोडण्यांत येत असे. श्रीसाई-नामाचा गजर करीत चाललेल्या भक्त-समुहापुढें एक शृंगारलेला अश्व अत्यंत शांत गंभीरपणें चाललेला असे. हा सुलक्षणी उमदा तट्टू एका भक्तानें अर्पण केला आहे.



कीर्तन प्रवचन व गायनादि कार्यक्रम रोज ठरावीक वेळीं होत असत. या उत्सवानिमित्त श्रीसाईबाबांच्या दर्शना-साठीं ठिकठिकाणचे अनेक साईभक्त कलावंतही आले होते. त्यांना बाबांची सेवा करण्याचें समाधान लाभावें व सर्वांची करमणूक व्हावी या हेतूनें रात्रीं ९ वाजल्यापासून त्यांचे विविध स्वरुपाचे गायन वादनाचे कार्यक्रम ठेवण्यांत येत असत. हे कार्यक्रम श्री बाबांच्यापुढें समाधि मंदिराच्या सभामंडपांत होत असत. त्यांत भाग घेणाऱ्यांची रोज चढाओढ लागत असे. एक दिवस तर सबंध रात्रभर कार्यक्रम चालू होते. रविवार, ता. ११ (विजया दशमी) व सोमवार, ता. १२ रोजीं गावांत फिरून भिक्षा मागण्याचा कार्यक्रम सकाळच्या प्रहरीं झाला. शिरडी संस्थान समितीचे प्रमुख चालक व विश्वस्त गळ्यांत भगव्या झोळ्या अडकवून वाजतगाजत भिक्षेसाठीं बाहेर पडत तेव्हां घरोघरीं प्रेमादरपूर्वक त्यांच्या झोळींत भरपूर भिक्षा भक्तिभाव-पूर्वक घालण्यांत येत असे.

अशा रीतीनें सतत चार दिवस चालू असलेल्या महोत्सवांत भाग घेण्यासाठीं येणाऱ्या स्त्रीपुरुष भक्तजनांची रहाण्यासवरण्याची व जेवणाखाण्याची समाधानकारक व्यवस्था ठेवणें ही साधी-सुधी गोष्ट नाहीं. त्यासाठीं संस्थान समि-तीतर्फे जबाबदार अशा सहा समित्या नेमून प्रत्येक समितीवर त्या त्या कार्याची आवड, अनुभव व माहिती असलेली उत्साही माणसें नेमण्यांत आली होती. १ स्वयंसेवक समिति, २ स्वच्छता समिति, ३ भोजनगृह समिति, ४ धार्मिक कार्यक्रम समिति, ५ निवासस्थान समिति व ६ लिलाव समिति, या प्रत्येक समि-तींतल्या सभासदांनीं दुसऱ्याच्या कामांत ढवळाढवळ न करतां आपापलें काम जास्तींत जास्त व्यवस्थीत रीतीनें पार पाडण्यासाठीं झटावयाचें असा संकेत असे व तो कटाक्षपूर्वक पाळण्यांत येत असे.

गांवांत साखरेचें सर्वत्र दुर्भिक्ष; परंतु उत्सव चालकांनीं पूर्वीपासून दक्षता बाळगून प्रयत्नपूर्वक जरूर तेवढी साखर मिळविली. व त्यामुळें उत्सवाच्या तीन दिवसांत सर्व भक्तजनांना गोड मिष्टान्नाचें भोजन देतां आलें.

मंगळवार दि. १३ रोजीं आरती, मंगलस्नान, गायन, संस्थानचा प्रातिनिधीक अभिषेक, भक्तजनांचा सामुदायिक अभिषेक तसेंच काल्या निमित्त सुश्राव्य कीर्तन होऊन सर्वांना प्रसाद वाटण्यांत आला व अशारीतीनें उत्सह भरांत सतत चार दिवस गाजत राहिलेल्या या महोत्सवाची श्रीसाईबाबांच्या कृपेनें व सर्वांच्या सहकार्यानें गोड समाप्ति झाली.

———


तारेचा पत्ता : 'ABHAY' Hyderabad. टेलिफोन नं. ४६३८

# हैद्राबाद सॅनेटोरियम

**खास क्षयरोग्यांसाठीं !**

हवेशीर आधुनिक सुखसोयींनीयुक्त अत्यंत माफक दर असलेलें व साईभक्तांनीं चालविलेलें एकमेव ठिकाण

पुण्याहून रेल्वेनें फक्त बारा तासांचा प्रवास.

**गरीब साईभक्तांस खास सवलत**

विशेष माहितीकरितां खालील पत्त्यावर लिहा:—

**सुपरिंटेंडेंट हैद्राबाद सॅनेटोरियम,**
**रमतापूर, हैद्राबाद १३. (आंध्र प्रदेश)**







★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते !

★

आ णि म्ह णू न च
हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,
ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि
आणि त्याचप्रमाणें वैशिष्टयपूर्ण
सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं तयार केलेले श्री साईबाबांचें तीन रंगी चित्र, द्वारकामाई व इतर एक रंगी फोटो—साईज १० × ८, १० × १४, १४ × २० व पोस्टकार्ड साइज खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

श्री. सगुण मेरु नाईक
मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर

मुद्रक : कृ. ना. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : ना. अं. सावंत, ईस्ट ॲन्ड वेस्ट इन्शुअरन्स बिल्डिंग, ४९/५५, आपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.